श्री.

श्रीहरिदास गोविंद नारक गीत.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्री[illegible]आश्रम

स्वामी महाराज (श्रीहरिगुरुभक्त गोविंद-

बावा नाशिककर) वास्तव्य श्री-

क्षेत्र काशी यांणीं के-

लेल्या

भक्ति, ज्ञान व वैराग्यपर

पदांचा संग्रह.

श्रीमन्० स्वामी महाराज यांची आज्ञाधारक व नम्र विद्यार्थि

मंडळी यांणीं

पुणें येथें

कै० विष्णुशास्त्री चिपळुणकर यांच्या चित्रशाळा छा० छापून

प्रसिद्ध केला.

आषाढ शुद्ध १५ शके १८०७.

प्रस्तावना.

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत् तारकाश्रमस्वामी महाराज (श्रीह-रिगुरुभक्त गोविंदबावा नाशिककर) यांचीं प्रासादिक प्रेमरसभरित पदें सर्व एके ठिकाणीं करून तीं छापून प्रसिद्ध केलीं असतां सर्वजनांचा बहुत उपयोग होईल असें जाणून त्या बद्दल श्री० स्वामिमहाराजांची आज्ञा घेऊन नंतर हा ग्रंथ छापण्याचें खटपटीस लागावें तों असें समजण्यांत आलें कीं, मागें श्रीमंत तुकोजीराव महाराज होळकर यांचे बंधु सर, काशीरावदादा साहेब होळकर याणीं व त्या प्रमाणेंच श्री० धार सरकारचे बक्षी श्री० बापा साहेब याणीं हा ग्रंथ छापण्या बद्दल श्री० स्वामी महाराज यांजपाशीं आज्ञा मागितली; परंतु त्या वेळीं, महाराजांनीं आपला संतोष न दर्शवून त्या बद्दल संमतीही दिली नाहीं. नंतर पुन्हा कांहीं मंडळी एकत्र जमून त्याणीं परम प्रेमनिष्ठापूर्वक श्री० स्वामी महाराज यांचे चरणीं ग्रंथ छापण्या बद्दल आज्ञा देण्या विषयीं प्रार्थना केली. त्या वेळीं महाराज याणीं आपला अभिप्राय कळविला तो:—

"हा ग्रंथ छापून प्रसिद्ध केल्यानें माझी जगांत कीर्ति व्हावी असा माझा मुळींच हेतु नाहीं. अशा प्रकारें मागें तीन चार गृहस्थानीं ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्या बद्दल मजपाशीं गोष्ट काढली होती; परंतु ती गोष्ट मजला पसंत न पडून त्या बद्दल मी आपला अभिप्राय दिला नाहीं. कारण मागें जे महान् महान् सिद्ध, साधु, भगवद्भक्त सज्जन मंडळी होऊन गेली त्यांच्या ग्रंथांचें अवलोकन करितां त्यां [illegible] अधिकार व तीं कवितें

अनुक्रमणिका.

अनुक्रमणिका.

अनुक्रमणिका.

॥ श्री ॥

अथ शरणागत प्रकरण प्रारंभ.

पद १.

(दे पायांची जोड मोरोबा. त्या चालीवर.)

दे चरणांचा संग मोरोबा॥ गिळितो काळ भुजंग ॥ध्रु०॥ ब्रह्मेंद्रादिक लाळ घोंटिती ॥ पाहुनि नव जन रंग ॥ अणिमादिकही ऋद्धी सिद्धी॥ तुज सेवुनि झिजविति अंग ॥ मोरो०॥१॥ जन्मुनियां मी नेणुनि तुजला ॥ केले विपरित ढंग ॥ क्षमा करुनि अपराध सर्वहि ॥ करि दुरितांचा भंग मोरो०॥२॥ जप तप साधन कांहिं न घडलें॥ ऐसा बहुत अपंग॥ या दीनावरि करिसि दया जरि॥ होतिल सर्वही दंग॥ मोरोबा दे चरणांचा संग॥३॥

पद २ (चाल- दे. च. जोड. मोरोबा)

मजवरि करुणा करी॥ विठोबा म०॥ धृ.॥ स्वजनें त्यजिला तुजला स्मरला॥ नक्रें धरिला करीं॥ धांवुनि लगबग सोडविला तो ॥ चक्र धरुनियां करीं॥ मज०॥१॥ वसन शरीरा

उदक प्यावया ॥ दे खाया भाकरी ॥ सर्व त्यजुनियां सद-
या आतां ॥ करिन तुझी चाकरी ॥ मज० ॥ २ ॥ दीनापरि
जन्मुनियां झालों ॥ स्वजनदास ऋणकरी ॥ कृपा करु-
नि नव सुखकर दर्शन ॥ दे मजला झडकरी ॥ मज० ॥ ३

पद ३. (चाल- दे चरणाची ओढ मोरोबा.)

माझा श्यामराज कैवारी ॥ आलें संकट तोचि निवारी ॥ ध्रु०
धर्म बुडवितां युगा युगिं करि ॥ असुरावरि सवारि ॥ नि-
रा तटीं नरसिंगपुरीं ॥ जो नांदे सहपरिवारीं ॥ १ ॥ शुद्ध
पक्ष वैशाख चतुर्दशी ॥ प्रगटुनियां शनवारीं ॥ हिरण्य
कश्यपु वारे गाजविली ॥ स्वजनास्तव तरवारी ॥ माझा०
॥ २ ॥ दीनजनां तारक तूं सदया ॥ संसृति पारावारी ॥ दा-
स तुझा मी मागतसें दे ॥ कृपा दृष्टिची वारी ॥ माझा० ॥ ३

पद ४.

(विठ्ठल मम प्राण सखा ॥ जिविंचा जीवन भेटल काय. ह्या चालीं.)

पांडुरंग मन मोहन नेत्र भरुन पाहिन काय ॥ ध्रु० ॥ हातीं घे-
उनि विणा टाळ ॥ भजन करुनि सर्वकाळ ॥ ठेवुनि सम
चरणीं भाळ ॥ बुका माळ वाहिन काय ॥ पांडु० ॥ १ ॥ ध-

रुनि सदां संत संग॥ गाउनि प्रेमळ अभंग॥ भजनी झिज-
वोनि अंग॥ प्रेम रंगला हिन काय॥ २॥ धैर्य धरुनियां म-
हान॥ होउनि संतपद वाहान॥ वंदुनियां थोर लहान॥
भूक ताहन साहिन काय॥ ३॥ पंढरपुरिं करुनि वास॥ स
तत नमुनि पीतवास॥ दीनापरि होउनि दास॥ सावका-
स राहिन काय॥ ४॥

पद ५. (राग गौरी-ताल दीपचंदी.)

पांडुरंगा मी तुझें लेंकरूं॥ तुजविण मी काय करूं॥ धृ०॥
काम क्रोध हे बुडविति मजला॥ मी त्यां किति अवरूं॥ १
बाप आई गणगोत तूंचि बा॥ नको मज दूर धरूं॥ २॥
तूं हरिणी मी पाडस तान्हा॥ तूं गाय मी वासरूं॥ ३॥ ब
हु अपराधी दीन ह्मणोनी॥ नको मज तूं विसरूं॥ ४॥

पद ६

(हरि बोलो हरि बोलो हरि बोलो भाई॥ हरि ना बोले वाको राम दुहाई॥ त्याचा०)

तुजवांचुनि मज कोण पुसल हरी॥ हे सुखसदना दुरितभं-
जना॥ धृ०॥ द्विज अपराधी गज नृग राजा॥ कोण तारी ब-
कि गोतम ललना॥ १॥ धर्मरहित अजामेळ वाल्मिकी॥

कोण तारी ध्रुव दैत्य नंदना ॥ २ ॥ पातकरत गणिकाही पिंगला ॥ कोण तारी गुहविदुरा हीना ॥ ३ ॥ दीन मूढ जड पतित जनांची ॥ तूंचो चुकविसी निरय यातना ॥ ४ ॥ ६

पद ७. (मन आवरा याहो· या चालीवर)

धांव देवराया रायाहो ॥ स्रुधराया जन्मकर्म सर्व हरायाहो ॥ ध्रु० ॥ जन्मुनि सजलों व्यर्थ मराया ॥ खटपट केली सर्व उदर भरायाहो ॥ १ ॥ तुजविण कोणि नसे अवराया ॥ प्राप्त झाली मजलागिं वरायाहो ॥ २ ॥ बुद्धि नसे नव गुण विवराया ॥ नाहीं अंगीं दृढ बळतप अचरायाहो ॥ ३ ॥ यम टपलासे देह चुराया ॥ दीन बंधू येई भवपार करायाहो ॥ ४ ॥

पद ८. (मन आवरा याहो त्या चालीवर·)

येई राम राया राया हो ॥ अनाथाचें संकट हें दूर करायाहो ॥ ध्रु· ॥ सार असार विचार रहित मी ॥ संसारचा केला फार व्यर्थ मरायाहो ॥ १ ॥ कांय विकल हा काय करावा ॥ मी तो गाय दावि पाय अपाय नरायाहो ॥ २ ॥ किलवाणी दीनवाणी ऐका ॥ खाणी दुःख देई पाणी मस्तकी धरायाहो ३

१ शरीर· २ समूळ नाश करणे·

पद ९. (चलो बिदुर घर जय्ये उधो· या·चा·)

सच्चिदानंद प्रत्यक् पूर्णा॥ हो प्रगट हरुनि आवरणा॥ ध्रु·॥ वर्णाश्रम धर्मानें केलें॥ निर्मळ अंतःकरणा॥ शम दमादि साधन साधियलें॥सेवुनि सद्गुरु चरणा॥२॥ उपासना ज्ञानासह घडल्या॥ अज्ञानि कां नये करुणा॥३ दुःख नासुनी आनंदासी॥ दे मज दीनोद्धरणा॥ ४ ॥

पद १०. (चाल- चल आऊं बिदुरा घरीं उद्धवा)

या दुःखापासुनी दूर करी॥ हे दयाघना मज घेइ करीं॥ध्रु· किति जन्मावें किती मरावें॥ किति भोगूं यमराज पुरी१॥ त्रिविध ताप बहु जाळिति निशि दिनीं॥स्वजनहि गांजिति परोपरी॥२॥शामल कोमल सुखदायक तुझी॥ मूर्ति पाहिली नाहिं बरी॥३॥अंत नको पाहूं तूं माझा॥ दीन दयाळा धांव हरी॥४॥

पद ११. (दावागे बाई देव यदुराज·या·चा·)

धांवाहो देवा नाहिं आतां धीर॥ सार रहित फारचि संसार भार भरला॥ मार[1] मार[2] वार तार भव सागर भरला१ स्तवन नमन यजन नसुनि भजन मन न त्यजिलें॥जन

१ मदन· २ ताडण.

न वनन जनन करुन जनरंजन केलें ॥ २ ॥ चरण शरण मरण हरण करी जगदाभरणा ॥ तरुण करुण अरुणेक्षण हे दीनोद्धरणा ॥ ३ ॥

पद १२.

(कपींद्रा सखी आहे कीं ॥ षड्गुणनरू आराम ॥ त्या चालीवर).

दयाळा हेंचि देई गजवदनों असो तव नाम ॥ मंगलधाम ॥ध्रु०॥ जप तप साधन करितां थकलों ॥ परि न सुटति हे काम ॥ क्रोधरिपु ॥ १ ॥ संसारींया बहुत तापलों ॥ तवपदीं दे विश्राम ॥ निरंतर ॥ २ ॥ अपराधी परि तव चरणावरी ॥ पडलों दीन गुलाम ॥ पाहि मज ॥ ३ ॥

पद १३.

(चल जाऊं विदुरा घरीं ॥ उद्धवा चल जाऊं० ॥ त्या चालीवर.)

सतत त्या चिंता हरिची मला ॥ जो हरि मायिक मला[1] ॥ ॥ध्रु०॥ स्थिर चर नानाविध जीवाचा ॥ फलदाता जो झाला ॥ रूपरहित निर्गुणीं सनातन ॥ साधक नाहिं जयाला ॥ १ ॥ जे मुक्तिंचे खोटे जड दुःखी ॥ वाटे त्यांतचि फसलारे ॥ परी विकार न होतां सकळहि व्यापुनि जो राहिला

[1] किल्बिष, पाप.

॥२॥ नास्तिक नासूं पाहति यास्तव ॥ गुहे माजि जो शिरला ॥ सांख्य कपिल सिद्धांती ह्मणती ॥ स्त्री करि संसाराला ॥ ३ ॥ व्यास शंकराचार्य गुरूनी शोधुनि प्रगटहि केला ॥ दीनासि सर्वज्ञ करुनिदे सत्यचि दानंदाला ॥ ४ ॥

पद १४. (भजोरे भय्या राम गोविंद हरी ह्या-चा.)

माझी लाज तुला यदुराया ॥ येईं धांवत साह्य कराया ॥ ध्रु॰ जन्मुनि वांयां शिणविलि काया ॥ नाहिं लागलों तव गुण गाया ॥ १ ॥ प्रियसुत जाया मिळति गिळाया ॥ योजिति दुरितासि कराया ॥ २ ॥ पडतों मि पायां चुकवि अपाया ॥ येऊं दे या दीनाची माया ॥ ३ ॥

पद १५.

(देवा तुझ्या उपकारा ॥ नाहिं नाहिं पारावारा ॥ त्याचालीवर)

तारि तारिं रामराया ॥ गेला गेला जन्म वायां ॥ ध्रु॰ ॥ टाकुनियां स्वकुलज धर्म ॥ केलें सर्वहि विपरित कर्म ॥ मजला मारिल तो यमधर्म ॥ काढिल चर्म नाशिल काया ॥ ॥ १ ॥ जन्मापासुनि केलें पाप ॥ भोगिन त्याचें कर्म अ-पाप ॥ त्याचा वाटतसे संताप ॥ तूं आई बाप येउं दे मा-

या॥२॥ केलें नाहीं गंगा स्नान॥ केलें नाहीं जप तप ध्या
न॥ केला साधूंचा अपमान॥ धरिला मान नरकीं जाया॥
॥३॥ प्रेमें स्नजन पथासि धरीन॥ आतां तें मीं कधिं न-
करीन॥ झालों सर्व गुणानें हीन॥ पडतो दीन तुझि-
या पायां॥४॥

पद १६. (नारायणाविण नगणी कोणा) या चा.

२ रणागतमा मज दाखविं चरणा॥ भय हरणा॥ ध्रु०॥
किति भोगूं या जन्मा मरणा॥ अवरिं तुझ्या माया वरणा॥
भव संतरणा॥ मज०॥१॥ घडलें नाहीं यागाचरण॥ य
मनियमासन धारणा॥ व्रतपारणा॥ मज०॥२॥ वरुणा
लय शारणा स्रख करणा॥ करुणा करी जगदाभरणा॥
द [illegible]॥ मज०॥३॥

पद १७. (राग झिंझोटी- ताल धिमा- तिताला)

पायीं वास देंई या जीवास॥ ध्रु०॥ दुर्द्धर षड्रिपु मजलाछळि
ती॥ झाले बहुत मवास॥१॥ वेदहि शास्त्रहि सद्गुरु सांग-
ति॥ सेवा पीत वास॥२॥ अपराधी परि शरण आलों तुज॥
सांभाळी नांवास॥३॥ तुजविण श्रीहरि दीन जनांच्या॥ वा-

रील कोण भवास॥ पायीं वास देई या जीवास॥ ४॥ ७॥

पद १८.

(माझा कृष्ण देखिला काय॥ कोणि तरि सांगा हो॥ त्या चाली.)

शरण आलों तुजला॥ मजवरि करि करुणा॥ ध्रु०॥ जन्मुनि केला विषया ध्यास॥ भुललों कामिनि आणि कनकास॥ दुःख दिलें जननी जनकास॥ त्या नरकास सोडवि तूं॥ १॥ बाळपणीं बहु केले खेळ॥ तरुणपणीं तरुणींचा मेळ॥ ऐसा गमाविला बहु वेळ॥ न करी हेळ तूं आतां॥ २॥ श्रमलों फिरतां दारोदार॥ मळलों करितां बहु परदार॥ सर्व खळांचा मी सरदार॥ होय उदार कृपाघना॥ ३॥ बहु अपराधी परि नव दीन॥ तुझिया चरणीं निशि दिनिं लीन॥ तारी अनन्य जैसा मीन॥ पराधीन नको करूं॥ ४॥

पद १९.

(ते मज निरवधि आवडती॥ भक्त महा सुकृती॥ त्या चालीवर)

कें मज भेटल भक्तपती॥ सर्वहि ज्या जपती॥ ध्रु०॥ ज्याच्या योगें वरिती झाली॥ मज द्रौपदी सती॥ जो असतां रथीं सायुध अमरहि॥ पामरसे दीसती॥ १॥ लाक्षाभ-

वनीं वांचविलें मज ॥ जेणें विदुरा हातीं ॥ मद्वचना मानी यत्सेवनीं ॥ इंद्रादिक राहती ॥ २ ॥ ब्रह्मादिक जाती प्रलयीं परि ॥ यत्सेवक नगती ॥ कर जोडुन प्रार्थिन या दीना ॥ द्या ? जनांत गती ॥ ३ ॥

पद २०.

(मेरे सांईसे राजी रहोरे ॥ गये भवसागर पार उतर ॥ त्या चालीवर)

शरण आलों चरणासी ॥ आतां माझा अंत किती पाह्यसी ॥ ध्रु० ॥ जन्मा पासुनि जें जें केलें ॥ त्या नगणी दुरितासी ॥ १ ॥ तुझिया द्वारीं धरण घेतलें ॥ तारि तारि गरिबासी ॥ २ ॥ तुज वांचुनि प्रभु कोणि नसे हरी ॥ सोडुनि कां तूं देसी ॥ ३ ॥ दीन दयाळा मज तारुनियां ॥ सांभाळी बिरुदासी ॥ ४ ॥ छ

पद २१. (राग खमाज० ताल एकताला०)

शरण आलों चरणीं ॥ आतां तारी मज हरी ॥ ध्रु० ॥ विहित त्यजुनि बुडालों मी पापसागरीं ॥ काढि काढि वरद पाणि- ठेविया शिरीं ॥ १ ॥ तारियली जशि गणिका तो जसा करी त्या परि हा अधम दया करुनि धारि करी ॥ २ ॥ बहु अनाथ पडतों मी तव पदावरी ॥ क्षमा करुनि मोह जाल तूंचि आ

वरी ॥३॥ जप तप व्रत दान धर्म न घडलें जरी ॥ दीनबंधू नाम तुझें तें खरें करी ॥ ४ ॥

पद २२.

(राग काफी- ताल दीपचंदी- कोणी हरि बोला कोणी हरि बोला- या-चा-)

देवा मज पाही ॥ तुजवांचुनि मज कोणि नाहीं ॥ ध्रु० ॥ जप-तप साधन नेणें कांहीं ॥ तारीं तारीं लवलाहीं ॥१॥ फस-लों व्यर्थचि या भवडोहीं ॥ बुडविति कामादिक साही ॥२॥ येवोनि माझ्या हृदयीं राहीं ॥ दीन जनांसी तूं साही ॥ ३ ॥

पद २३.

(नारायणाविण नगणी कोणा ॥ गाईना ॥ त्या चालीवर)

माझ्या अवना करी हे सुखसदना पावना ॥ ध्रु० ॥ आप्त गोत स्वजनांही त्यजिलें ॥ चुकवी त्या यमशासनाही वासनाकरी मज ॥ १ ॥ जन्मो जन्मीं विषय भोगिले ॥ परि मन हें स्थिर राहीना तुज पाहिना ॥ २ ॥ तुजवांचुनि हा दीन आतां हरी ॥ कवणा शरणहि जाईना गुण गाईना ॥ ३ ॥

पद २४ (रागिणी देश- ताल झंपरा-)

धांवुनि अनंता येई भगवंता ॥ सोडवि ताता तुजविण त्राता ॥

नाहीं कोणी आतां ॥ हरि भवचिंता ॥ दावी तव पाय ॥ ध्रु० ॥ किति सोसूं या स्मृत कांतांच्या आक्रांता ॥ इंदिरेच्या कांता ॥ सोडुनि एकांता ॥ होउनि नियंता, चुकवि अघाता ॥ बोलूं फार काय ॥ १ ॥ तुज पाहूं जातां ॥ येतां खातां गातां ॥ जागतां निजतां उठतां बसतां ॥ चालतां बोलतां ॥ ऐकतां पाहतां ॥ चुकवी अपाय ॥ २ ॥ माझा तूंची माता जनिता भ्राता चुलता ॥ दुहिता जामाता ॥ चित्ता आवडता ॥ देता देवविता ॥ मारिता तारिता ॥ झालों दीन माय ॥ ३ ॥

पद २५.

(सख्या लागिलो लागिलो मन लागिलो सख्या ॥ या ठुंबरीचे चालीवर)

गांजिलों गांजिलों बहु गांजिलों देवा ॥ ध्रु० ॥ द्रव्यमदें अणि देहबळानें ॥ मत्त गजापरि मातलों ॥ १ ॥ द्रव्यहि गेलें शारिरहि सुकलें ॥ भवदावानळिं तापलों ॥ २ ॥ दीन तुझा मी बहु अपराधी तव [illegible] ने पावलों ॥ ३ ॥

पद २६. (राग- काफी- ताल धिमा- तिताला-)

देवा तारि तारि तारि मजलागिं अतां ॥ बहु शिणलों भवसागरिं भ्रमतां ॥ ध्रु० ॥ मेळवितां धन [illegible] जना राधन ॥ श्रमलों सा-

धन बहु करितां ॥१॥ २ुत वर दानीं तुज सम दानीं ॥ तूंचि निदानीं सोडविता ॥ धरितों पायां दावि उपाया ॥ चुकवि अपाया भगवंता ॥३॥ दीनोद्धरणा संकट हरणा ॥ दावी चरणा करि ममता ॥४॥

पद २७.

(नारायणा वीणा नगणी कोणा गाईना ॥ ह्या चालीवर)

रामा धांवुनि ये दुष्टविरामा ॥ अभिरामा ॥ ध्रु० ॥ कामासीं मनीं धरुनि रिकामा ॥ भुललों बहु गृह पशुधन कामा ॥ वरुनि रामा ॥१॥ श्यामा[1] होता सेवुनि श्यामा ॥ रमलों सोडवि तूं घनःश्यामा ॥ करी आरामा ॥ २ ॥ सुदामापरि[2] दया सुदामा[3] ॥ करिया दीना सहि सुदामा[4] ॥ ती उपरामा ॥३॥

पद २८. (मेरे सांईसे राजी रहोरे ॥ या चालीवर)

आतां बोलणेंचि नाहीं ॥ ब्रह्मावांचुनि कांहीं ॥ ध्रु० ॥ दशम मीच मज लागि दावितां ॥ मीच श्रीगुरु साही ॥१॥ जें भासे तें ब्रह्मचि झालें ॥ सोहं वृत्ति प्रवाहीं ॥ २ ॥ एक सत्य मी दृश्य बुडालें ॥ माया मृगजळ डोहीं ॥३॥ मी रचिलें त्यांतचि मी शि-

---

१ श्यामा म्ह० तरुण, रात्र० २ सुदामा= सुदामदेव० ३ द्रव्य संपन्न० ४ उत्तम माळा०

तु मुख्य दुःखाला ॥ चा॰प॰॥ मूढा देती सोडून ॥५॥ टाकविली अविद्या माझी ॥ सोडविली त्याची माया ॥ दीनत्वही माझें गेलें ॥ नेलें तव महत्व विलया ॥ दोघांचें ऐक्यही झालें साक्षीच्या गयीं सखया ॥ चाल ॥ साक्षीचें साक्ष्यहि जातां ॥ कूटस्थ राहिला नुसता ॥ तो सच्चिदानंद पुरता ॥ चाल पहिली ॥ तो प्रत्यक् परिपूर्ण ॥ जीव तो बोले परेशा ॥ ६॥

इति शरणागत प्रकरणं

अथ साधु प्रकरण प्रारंभ.

पद १ (राग काफी- रेवा तुझ्या उपकारा.ह्याचा॰)

जाई जाई गुरुपाशीं ॥ गुंतुं नको मोहपाशीं ॥ध्रु॰॥ मी एक गुणाढ्य पृथ्वी वरता ॥ मी एक भोक्ता मी एक कर्ता ॥ या अभिमाना सारुनि पर्ता ॥ होय वर्ता गुरुभजनासी ॥ १ ॥ किति ह्मणसी मी गुणवंत ॥ किति अर्जविशी श्रीमंत ॥ किति निंदिसि संतमहंत ॥ करिसिल खंत परिणामासी ॥ २ ॥ पुरे पुरे हा संसार ॥ पाही शोधुनि सारासार ॥ कांहितरी

करिबा पर उपकार ॥ धरि निर्धार श्रुति· चनासी ॥ ३ ॥ दुर्ल·
भ नाशवंत हा देह ॥ यासि नाहीं बा संदेह ॥ सोडुनि दे स्त्री·
सुत धनगेह ॥ करि तूं स्नेह दीन जनासी ॥ ४ ॥ जाई जाई० ॥

पद २. (राग भैरवी· ताल त्रिताला·)

तुझिया दासाचा दे निशि दिनिं मज सहवास ॥ ध्रु· ॥ तीर्थ व्रतें अधिकारी तारिती ॥ साधू तारिति सर्व जीवांस ॥ १ ॥ तुज हुनि अधिकसाधु या विषयीं ॥ साक्षी अंबऋषी दुर्वास ॥ २ कनक कामिनी विषवत मानी ॥ इच्छिना अमृताचाहि स्वास ॥ ३ ॥ दर्शनमात्रें खग मृग दीनहि ॥ पावति मोक्षाच्या विभ वास ॥ ४ ॥

पद ३. (राग· भैरवी·)

साधुसंग घडो मजलागि हरी ॥ हेंचि मागतसें तुजलागीं ॥ धृ· ॥ ज्या पुरुषाच्या द· निमात्रें ॥ होती कृतार्थ अभागी ॥ ॥ १ ॥ भेद बुद्धि ज्या ह्रदयिं वसेना ॥ सर्व जनीं अनुरागी ॥ २ ॥ दीनपणें हरिभजनें झाला ॥ मुक्तिपदाचा भागी ॥ ३ ॥

पद ४. (राग बिहाग· तराण्या· चा· दीम तन दर·)

गुरूच्या वचना मनिं धररे ॥ दृढ तररे ॥ भव तररे ॥ तनमन

धन हें गुरुपदिं वाही।ध्रु०॥ मानवा करिसि किति धन धन ॥ तूं खरा खरा वण वण वण वण सकल विकल पाहि॥१॥ सधना ह्मणसि किति जीजी वद वद भक्तिनें सदा हर हर हर हर ॥ याहुन सुलभ नाहीं॥२॥ विषय गरल सम छी छी त्यज त्यज ॥ साधुच्या पदा धर धर धर धर॥ दीन होउनि राहि॥३॥

पद ५. (माझा कृष्ण देखिला काय.त्या चा०)

घेउनियां नरदेहासी ॥ ब्रह्मविचार करा॥ धृ०॥ उग जागे व्हा झडकर॥ प्राप्त करुनि घ्या सद्गुरुवर ॥ र् ह्मज्ञान करा सादर॥श्रुति हितकर सांगतसे ॥१॥श्रद्धायुक्त धरा गुरुपाय॥ त्या वांचुनि हें दृश्य न जाय ॥ सांडा भोगांतीं नरकाय ॥ चुकवा अपाय भ्रांतीचे ॥२॥ सोडुनि द्या बहुशास्त्र विचार॥ उगेंचि बोलुं नका रे फार ॥ केवळ वाचेस तो विकार॥ एकचि सार प रमात्मा ॥३॥ पावुनि अमोल्य नरदेहास॥ जो कां करिना ज्ञानाभ्यास॥ त्याचा मोठा होइल नास॥ दीनदास प्रार्थितसे॥४॥

पद ६. (चाल जाउं विदु० या चालीवर-)

देवा तव मायाही अनिवार॥ध्रु०॥ निःसंगा [illegible]वेण॥

करवी दृद संसार ॥ १ ॥ विधी चंद्र शिव इंद्र अशासहि ॥ करिजो सहज विकार ॥ २ ॥ पाहूं जातां जो न दिसे परि ॥ भासवि जो व्यवहार ॥ ३ ॥ ह्मणवुनि दीन तुझा मी झालों करि मज तूं भवपार ॥ ४ ॥

पद ७.

(वंदे श्रीगजमुख मंगल जनि बालं ॥ विधु कललित भालं ॥ या. चा.)

कांरे भुललासी मायिकरंगा ॥ शोधी निःसंगा ॥ धृ. ॥ दिसतें जरि दुरोनि मरीचि तोय ॥ परि उखरचि भोय ॥ शिंपेवरि रोप्यहि होय जाय ॥ सांग खरें तें काय ॥ १ ॥ जलधीवरि होती जाति तरंग ॥ वायूचा योग ॥ जलधी तो पवनानेंहि अभंग ॥ तेसा तूं असंग ॥ २ ॥ दोरासी विसरुनि ह्मणती साप ॥ हा व्यर्थ विलाप ॥ तूं तो अजरामर नित्य अरूप ॥ तुज नाहिं त्रिताप ॥ ३ ॥ द्रष्टा सकळांचा तूंच आहेसी ॥ अद्वय अविनाशी ॥ जेसा सविता हा सर्व विकासी त्या कोण प्रकाशी ॥ ४ ॥ स्थाणूसी भुलोनि वदती चोर, स्थाणू अविकार ॥ गगनावरती मालिन्य प्रकार ॥ केवळ अविचार ॥ ५ ॥ आतां तरि करि तूं ज्ञानाभ्यास ॥ त्यजिवि-

षयाध्यास॥ राहें होउनियां दीन उदास॥ भोगी [illegible]॥

पद ८ (भावें संत समागमें राही॥ या चालीवर.

सारासार विचारूनि पाही॥ संसारीं सुख नाहीं॥ ध्रु॥ कोण मिहें जग कैसें झालें॥ हेंचि शोधिं लवलाही॥ १॥ ब्रह्म खरें सारें जग खोटें॥ वेदशास्त्र देति गाही॥ २॥ सद्गुरुच्या वचना अनुभवुनी॥ सदां आनंदमय राहीं॥ ३॥ दीनपणें सद्गुरुसि भजावें॥ नको मग दुसरें कांहीं॥ ४॥

पद ९.

(उद्धवा चल जाऊं विदुरा घरीं॥ उद्धवा० त्या चालीवर)

भक्तांचा अभिमानी॥ प्रभु हा भ०॥ धृ०॥ भक्तार्पित फल पत्र पुष्प जल॥ थोडेंही बहुमानी॥ १॥ भक्तांचें संकट वाराया॥ [illegible] नियमांनीं॥ २॥ भक्तांसी प्रेमें आलिंगुनि॥ पूजितसे [illegible]मांनीं॥ ३॥ दीन भक्त ते निजलोकाप्रति॥ बसवुनि नेत विमानीं॥ ४॥ प्रभु हा भक्तां०॥ ७॥

पद १० (चल जाऊं विदुरा घ० या चालीवर.

दीनांचा कैवारी॥ प्रभु हा दी०॥ धृ०॥ योगक्षेम सदां वाहतसे॥ सर्वहि दुरित निवारी॥ १॥ दीनाचे सदनीं राहतसे॥

निशिदिनिं सहपरिवारीं ॥ २ ॥ वैकुंठहि सोडुनियां झाला ॥ गोकुळीं जो गोंवारी ॥ ३ ॥ दीन मूढ अधमहि तारितसे ॥ संसृति पारावारीं ॥ ४ ॥

पद ११. (चाल- चलजा० विठु० घरीं०)

दासांचा हितकारी ॥ प्रभुहा दा० ॥ ध्रु० ॥ भक्त छलक मातुल मारूनियां ॥ ह्मणवितसे अविकारी ॥ १ ॥ युगायुगीं हरिदासा करितां ॥ जन्मादिक स्वीकारी ॥ २ ॥ ज्याच्या योगें ब्रह्मेंद्रादिक ॥ झाले हे अधिकारी ॥ ३ ॥ दीनपणें पदिं लीन झालिया ॥ होत असे उपकारी ॥ प्रभुहा० ॥ ४ ॥

पद १२

(नामनौका सुखसाररे ॥ केली भवसागरीं तारक त्या चा०)

तुकाराम स्तव.

ह्मणोनियां अवतरला या महीवरी ॥ तुकया स्वामी ॥ ध्रु० वेदत्रयिनें मोकलिले हे ॥ स्त्रीशूद्रादिक कामी ॥ १ ॥ अभिमानाच्या योगें जपिं तपीं ॥ बुडती गरिब रिकामी ॥ ॥ २ ॥ दीन जनांसी मुक्ती द्यावया ॥ घेतलि जेणें हामी ॥ ३ ॥ ह्मणोनियां अवतरला या महीवरी ॥ तुकया० ॥

पद १३. (चाल-रामनामाची गर्जना कोणआणेरे)

श्रीज्ञानेश्वरस्तव.

इंद्रायणीच्या तीरीं हा ज्ञानदेवोहो ॥ शमवाया दुरितासी ज्ञानदेवोहो ॥ धृ. ॥ भाविकांच्या गुंतला भाकेलाहो ॥ भक्ति-मार्ग प्रत्यक्ष उभा केलाहो ॥ १ ॥ प्रतिष्ठानीं जडरेडा बोलविलाहो ॥ चांगदेवाचा गर्व घालविलाहो ॥ २ ॥ गीते साठीं माधव अवतरलाहो ॥ ज्याच्या नामें जड दीन भव तरलाहो ३

पद १४. (चाल- चलजाऊं विं॰).

श्रीमच्छंकराचार्य जगद्गुरुस्तव.

भजत शंकराचार्य गुरुवरं ॥ धृ. ॥ मंडनमिश्र प्रमुखान् जित्वा ॥ दुर्जन कुपथ हरं ॥ १ ॥ चतुर्दिक्षु मठपतीन् विधाय ॥ वैदिक मार्गकरं ॥ २ ॥ दुर्मद मतखंडनकृतभाष्यं ॥ दीनदयासागरं ॥ ३ ॥

पद १५. (चाल- नहि जमुना जलजाय्ये किसन॰)

भजा शंकराचार्य गुरुराय ॥ ध्रु. ॥ नास्तिक मत खंडुनी आस्तिका ॥ केला सुगम उपाय ॥ १ ॥ चारि दिशा मठपती स्थापुनी ॥ हरिले सर्वअपाय ॥ २ ॥ दीन मूढ सत्पथीं लाविले ॥

दाउनि शंकर पाय ॥ ३ ॥

पद १६. (चाल- चलजा- विदुराघ-)

जय जय भाष्यकार महाराज ॥ धृ० ॥ दुष्ट मतांनीं वेदपथासी ॥ दिधली होती लाज ॥ १ ॥ ब्रह्मसूत्र मीमांसा करुनी ॥ हरिला नास्तिक माज ॥ २ ॥ कलिमाजी संन्यास स्थापिला केला दिव्य समाज ॥ ३ ॥ दीन करुनि द्वैतांसी केलें ॥ अद्वैतासि रताज ॥ ४ ॥

पद १७. (चाल- गड्यानो कृष्ण गडी आपुला-)

करुनियां एकांतीं वसती ॥ श्रीगुरु शिष्यासी पुसती ॥ धृ० ॥ अरे तूं कोठुनि आलासी ॥ कोठें निशि दिनिं तूं वससी ॥ कवणासंगेंही असती ॥ पुन्हा तरि कोठें बाजासी ॥ कोण तुज असे आदि अंतीं ॥ श्रीगुरु० ॥ १ ॥ तात किति माता पाहियल्या ॥ तुवां किति कांता भोगियल्या ॥ किति तुज संततिही झाल्या ॥ लाज तुज नाहीं लोभ्याला ॥ आतां चद वैराग्या वरती ॥ श्रीगुरु० ॥ २ ॥ तूं सच्चिदानंद असती ॥ आपुलें स्वरूप [illegible]ललासी ॥ हेंचि अज्ञान आलें तुजसी ॥ ब्रह्म तें नाहिं नाहिं ह्मणसी ॥ यासि आवर्ण वेद ह्मणती ॥ ३ ॥

पुढें तुज विक्षेपहि झाला ॥ ह्मणसी आत्मा देहाला ॥ प्राण मन बुद्धि इंद्रियांला ॥ मानिसी जातीव [illegible] ॥ झाली तुज विपरीत मती ॥ श्री० ॥ ४ ॥ द्रष्टा सर्वांचा असती ॥ शोक-मोहातें नातळसी ॥ जन्म मरणासि न सांपडसी ॥ क्षुधाआणि तृषा नाहीं तुजसी ॥ असी महावाक्यही सांगती ॥ श्री० ॥ ५ ॥ ऐक बा याचें निरूपण ॥ सुखी असुनी होसी कृपण आपुला रिपू तोहि आपण ॥ यास्तव सोडी जीवपण ॥ दीनता सोडुनि घे सुगती ॥ श्रीगुरु० ॥ ६ ॥ इति द्वितीय प्र०

इति साधुप्र० समाप्तम्.

प्रकरण तिसरें.

अथ उपदेश प्रकरण प्रा०

पद १.

(नाम नौका दृट सार हो ॥ केली भवसागरीं तारक. त्याचालीवर.)

किति तरि सांगुं तूज फार हो ॥ होई प्राण्या सावध झटपट ॥ धृ. ॥ तळमळसी संसारीं सटपट ॥ सिणविली वाणि अनिवार हो ॥ सभे माजी बोलुनि यां घटपट ॥ १ ॥ निजधर्माचीकृ-

रूनियां गटपट ॥ कुटुंबाचा वाहोनियां भार हो ॥ द्रव्या साठीं बहु केली खटपट ॥ २ ॥ मारिल यमजें रडसिल पटपट॥ सोडिल हा तुज परिवार हो ॥ तेव्हां तुझी होइलबा लटपट ॥ ३ ॥ [illegible]ाचा सुकेल ही रटपट ॥ सद्गुरुसी करितां विचार हो ॥ दीनपणा जाइलहा चटपट ॥ ४ ॥ होई प्राण्या० ॥ ७॥

पद २ (चाल- कपींद्रा सुरवी आहे कीं षड्गुण तरु०).

मनुजा सावध होउनी ॥ भज भज सीताराम तो अभिराम ॥ धृ० ॥ नरदेहाचें सार्थक हेंची ॥ करिबा विषयिं विराम ॥ मनांतूनीं ॥ १ ॥ रामाविण परलोकीं नाहीं ॥ या लोकीं आ[1]हीराम ॥ ह्मणती जन ॥ २ ॥ बहुपापी नामानें पावति ॥ नंदनाख्य आ[2]राम ॥ निरंतर ॥ ३ ॥ दीनपणें रामासी भजनां ॥ सधन सुतनय सु[3]राम ॥ होतिते ॥ ४ ॥

पद ३.

(क्षुधित वनीं गोविंद बाईनो ॥ स्थिरचर समन मिलिंद त्या चालीवर.)

त्यजि वि[illegible]। छंद मनुजा ॥ भज भज तो सुखकंद ॥ धृ० निशि दिनिं ब्रह्मविचार करावा ॥ होउं नको मतिमंद ॥ १ ॥

---

१ अराम= विश्रांती. २ आराम= बाग. ३ सुराम म्हण० सुरामा= उत्तम स्त्री.

मायिक हें जग जाणुनि सर्वहि ॥ भोगि तूं ब्रह्मानंद ॥ २ ॥ श्रीगुरुचरणीं विश्वासावें ॥ चुकविति ते भवबंद ॥ ३ ॥ दीनपणानें राहुनि पाहे ॥ सर्वाभूतिं मुकुंद ॥ ४ ॥

पद ५.

(राग- हमिरकल्याण. ताल – होई सावधान हरिचे चरणिं र० मनु०).

घालोनियां कांस ॥ निशि दिनिं हरिभजनीं प्रेमानें ॥ होईसावकास ॥ ध्रु० ॥ संचित सर्वहि पाप जळुनियां ॥ होइल बुद्धिविकास ॥ प्रतिदिनिं गु[illegible]यें प्रगटल ॥ हृदयीं सत्वप्रकाश ॥ १ ॥ कृतयुगिं ध्यानादिक त्रेतायुगिं ॥ यज्ञादिक लोकांस ॥ द्वापारीं परिचर्या कलियुगिं ॥ नामचि हरिशोकास ॥ २ ॥ मही डळमळो जळही बुडवो ॥ जाळो वन्हि भजकांस ॥ वायू खवळो शोष करोकां ॥ तुटुनि पडो आकाश ॥ ३ ॥ हरि विधिला कथि विधि* नारदास ॥ सांगे निज तोकास[1] ॥ नारद व्यासासहि हेंचि कथी ॥ व्यासही हेंचि शुकास ॥ ४ ॥ दीनजनांसी नामावांचुनि नाहीं अन्य निकास[2] ॥ भजनानंदें केवळ सुख घे ॥ दूर करी नरकास ॥ ५ ॥ ७ ॥

१ तोक म्हणजे पुत्र. २ निकास म्हणजे मार्ग. * विधि म्हणजे ब्रह्मदेव, प्रजापति इत्या०

पद ५. (गड्यानों कृष्णा गड्या आपुला. या. चा.)

त्यजुनियां देहाची ममता ॥ शरण त्या जावें भगवंता ॥ धृ० करा या विचार देहाचा ॥ कोठा हा मलमूत्राचा ॥ पुतळा रुधिर-मांसाचा ॥ भरंवसा क्षणाहि नसे ज्याचा ॥ यास्तव सोडा अहंता ॥ १ ॥ कितिक मानव गेले जाती ॥ व्यर्थ किति होतिल ते पुढती ॥ माझें माझें जे म्हणती ॥ शेवट होतअसे माती ॥ शोधुनी पहा भगवद्गीता ॥ २ ॥ येउनियां नरदेहासी ॥ भजावें ज्ञानवंत गुरूसी ॥ निःस्पृह होऊनि वनवासी ॥ आणावें ज्ञान अनुभवासी ॥ सर्वांभूतीं धरा समता ॥ ३ ॥ असीही पुन्हा नये वेळ ॥ सांडा विषयांचा खेळ ॥ नकारे होऊं वाचाळ ॥ करा परमात्म्यासी मेळ ॥ दया करतो दीनावरता ॥ ४

पद ६.

(भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयीं बुधा ॥ धरिसि तरि हरिचा सेवक सुधा. या.)

साररहित संसार सुखासी कसा रमसि फारसा ॥ सेवीं हरिच्या पदसारसा ॥ धृ० ॥ तार लावुनीं सीतारमणीं गीतारस भारता ॥ सेवुनि होय जगा तारता ॥ १ ॥ वार सर्वपरि वार करी तरवार होय बरवा ॥ हरिवश होतो सुस्वर रवा ॥ २ ॥ दीनदास हो उ-

दास सोडी मदास घे सुखसदां ॥ त्यजिं वासना नरकवासदां३

पद ७. (मला जन्म हा तुला ला० खुला०) त्याचा.

आशा मानसिं पि[illegible]॥चवत हो सोडि तोडि [illegible]व पाशा ॥ अशांत शोधी स्वयं प्रकाशा ॥ ध्रु० ॥ गाशावरती उशा लावुनी बैससी पिऊनी नशा ॥ ह्मेशा परित्या नेसी निशा ॥ १ ॥ दुशाल ओढुनि मशाल लावुनि हिंडसि दाही दिशा ॥ अरशा घेउनि पाहसि मिशा ॥ २ ॥ खुशाल देखुनि माशा परित्यामिळति मामि मावशा ॥ खाशाची करिति दुर्दशा ॥ ३ ॥ केशां धरुनी शासन देइल यम करिल चौकशा ॥ फडशा उडविल मारुनि कशा ॥ ४ ॥ पैशाचा बहु क्लेशा जाणुनि सोडी त्या अपयशा ॥ हुशार होउनि भज जगदिशा ॥ ५ ॥ कुशासनावरि विशाल नयना ध्याई सज्जनवशा ॥ कशासि दीनपणा बालिशा ॥ ६ ॥.

पद ८.

(चाल- ठुंबरी- सांवरियानें कोन मंत्र पद ॥ फूक बजाई बासुरया ॥).

हें वय नासुनि जाइल मनुजा ॥ कांहिं तरी बा सोय धरी ॥ धृ० ॥ ज्याच्या योगें चालसि बोलसि ॥ त्याचा तरी बा शो-

ध करी ॥१॥ मी माझें हें ह्मणविसि ज्यानां ॥ ते तुज गांजि-
ति परोपरीं ॥ २ ॥ यमसदना जाती त्या पाहसी ॥ तथापिवि
ससि निसुर घरीं ॥ ३ ॥ करुणाघन हा दीनजनास्तव ॥ नांद-
तसे बा चराचरीं ॥ ४ ॥

पद ९. (राग काफी· ताल धिमा· तिताला·)

जाइ जाई मानवा हरिपायीं ॥ धृ· ॥ ज्या समयीं जें देइल
ईश्वर ॥ अमृत ह्मणोनि सुखें खाई ॥ १ ॥ अंतकाळीं कोणि
न सोडिती ॥ स्त्रिया बंधुसुत जांवाई ॥ २ ॥ जन्म मरण मो-
चक श्रीहरिचें रूप निरंतर ध्यायीं ॥ ३ ॥ दीनपणें पदिं ली-
न होउनी ॥ सुखकर गुण गण गाई ॥ ४ ॥ जाइ जाई मा०

पद १०. (राग- झिंजोटी· ताल दीपचंदी·)

मानवदेहीं आलासी ॥ आतां जाई शरण गुरूसी ॥ धृ· ॥ नीच
योनि फिरतां [illegible] ॥ नरकीं बहु पचलासी ॥ १ ॥ जननी
जठरीं सोहं स्मरलासी ॥ त्याहि पदा भुललासी ॥ २ ॥ उद-
रा करितां धवंतलासी ॥ अर्जवितां शिणलासी ॥ ३ ॥ दीना-
स्तव जो धरि स्वरुपासि ॥ त्यासि कधिं न स्मरलासी ॥ ४ ॥
मानवदेहीं आलासी ॥ आतां जाई शरण गुरूसी ॥ ७ ॥

पद ११. (चाल-भाव धारे- आपुलासा देवकु॰)

आत्मा कैसा ॥ जो भाविल त्याला तैसा ॥धृ॰॥ विचित्र मायेची कल्पना ॥ आधीं जीवाची करिरचना ॥ त्यापासून हे विकल्पनाना ॥ ईश्वर न धरी फळवासना ॥ न करी आसा ॥ ॥१॥ कोणी देहप्राण मन मानिती ॥ कोणी बुद्धि इंद्रिय वृत्ति ॥ कोणी काळदिशा गुण नियती ॥ कुलधर्मादिक देशप्रवृत्ती ॥ सर्व विलासा ॥ २॥ मौनी नागवेच किति फिरती ॥ योगी पृथ्वीवर ना बसती ॥ निर्वान ऊर्ध्वबाहु ते होती ॥ हठानें धूम्रपान किति करिती ॥ जाति वनवासा ॥ ३॥ कोणी अंगा राख लेपिती ॥ गोपीचंदन मुद्रा लाविती ॥ भाळीं शेंदुर त्रिशूल हातीं ॥ कुंकू लावुनि कवड्या घालिती ॥ पाहा तमासा ॥ ४॥ पृथ्वी आप तेज वायूस ॥ आकाशासि न्यूनता ध्यास ॥ रामानुज सोडिति वेदास ॥ लिंगाइत ते बसवण्णास ॥ जैन अहिंसा ॥ ५॥ कोणी परशुराम रघुराम ॥ कोणी श्रीकृष्णाहि बलराम ॥ कोणी शिवशक्ती रविकाम ॥ गणपति भैरव विठ्ठलनाम ॥ खंडोबा जैसा ॥ ॥६॥ ब्राह्मण ह्मणती वेदसार ॥ क्षत्रि ह्मणती दालतरवा-

र॥ वैश्य ह्मणति मुख्य व्यवहार॥ शूद्र ह्मणती सेवासा-
र॥ देव पाऊंसा॥७॥ प्रल्हादासि देव नरहरी॥ रावणकं-
सादिकांसि वैरी॥ उद्धव अर्जुन मित्रापरी॥ नारदसन-
का जो हितकारी॥ परमहंसा॥ ८॥ विकल्प सांगावे कि-
ति आतां॥ सर्वा कारण मुख्य अहंता॥ सारे असत्य हें त-
त्वतां॥ सर्वा अधिष्ठान चित्सत्ता॥ स्वयंप्रकाशा॥ ९॥ या-
स्तव शमदमादि साधावें॥ सद्गुरु वचनीं विश्वासावें॥ एकां
तीं मन स्थीर करावें॥ केवळ ब्रह्मस्वरूप व्हावें॥ त्यजुनि
अभ्यासा॥ १०॥ आत्मा सच्चिदानंद जाण॥ प्रत्यक् एक-
रूप परिपूर्ण॥ अनाम अरूप निरंजन॥ नित्या परोक्ष-
वेद प्रमाण॥ दीन हरिदासा॥ ॥११॥ ॥७॥ ॥

पद १२. (चाल- भाव धरारे- आपुला सा देव०)

असा धरि छंद॥ जाय तुटोनियां भवबंद॥ धृ०॥ छंद लाग-
ला टिटविला॥ तिणें समुद्रही शोषिला॥ मैनावतिनें कृ-
तार्थ केला॥ गोपीचंद॥ १॥ दुधाचा सागर उपमन्युला॥
अढळ[illegible]रे तो ध्रुव बसला॥ मार्कंडेयें यम हटविला
॥ झाला मंद॥ २॥ झाले तीन देह भरताला॥ रावण रामरू

विकट किति खटपट ॥ घट पट मठ नको वट वट ॥ पोरा पोरा ॥ नट सम चट त्यजिं कट कट ॥ यम भट खट करि चट गट ॥ उलट उलट निकट प्रगट ॥ सारी दरीला ॥ १ ॥ गर[1]कंधर हर हर वद ॥ सुर नर वर अमर विशद[2] ॥ थोरा थोरा ॥ खरतर[3] भवदर[4] हर पद ॥ स्थिरचर भर दीन करद[5] ॥ परम निरत सुंदर रद[6] मारी अरीला ॥ २ ॥ भज भज मनुजा आ० ॥

इति उपदेश प्रकरणं संपूर्णं.

प्रकरण ४ थें.

अथ कीर्तन प्रकरण प्रारंभः

पद १ लें.

(चाल- चल आउं विदुरा घरीं उद्धवा चल०)

जय जय रामकृष्ण हरी ॥ धृ० ॥ गोवर्द्धनधर गोपाल नरत गोकुल संकट हारी ॥ १ ॥ नवनीरद सम नवनीतप्रिय ॥ नवल विनोद विहारी ॥ २ ॥ दुर्वासोनुत दुःखविमोचक[7] ॥ दुर्जन

---

१. गरकंधर= शंकर. २ विशद= स्वच्छ. ३ खरतर= कठीण. ४ भवदर= संसारभय हरण करणारें. ५ करद= अभयरूप कर देणारा. ६ रद= दंत. ७ दुःखविमोचक= दुःखनाशक.

संघ महारी ॥ ३॥ शरणागत दीना-चरणीं ने॥ करुणा दृष्टि-
निहारी॥ ४॥

पद २. (चाल जाऊं विदुरा घरीं· ह्या चालीवर·)

कलियुगिं सकला नामचि तारक॥ ध्रु·॥ परमेश्वरहि ज्याना-
मानें ॥ झाला जगदोद्धारक ॥ १ ॥ यज्ञादिकहि सर्वा कर्मा॥
होतें जें उपकारक॥ २॥ वेदशास्त्र ब्राह्मणा सुखदहें॥ मू-
दा नामविधारक[1] ॥ ३॥ महादोष प्रबला विघ्नासी॥ षट् शत्रू-
चें मारक॥ ४॥ सनकादिक तरले वाल्ह्याही॥ झाला पाप
विदारक॥ ५॥ नागलो[illegible]ें गाती महिवर नर ॥ स्वर्गीं ते वृंदा-
रक॥ ६॥ हेमगर्भमात्रेहुनि दीना॥ जेशी शंठी सारक॥ ७॥

पद ३. (राग पिलु· ताल नितोंला·)

मनुजा हरिभज हो॥ विष[illegible] सम त्यजहो॥ धृ·॥ अज्ञा-
नानें झालें सारें॥ यासि भुलुनियां रहासि कसारे॥ सोडुनि
देई व्यर्थ पसारे[+]॥ सावध होई आजहो॥ १॥ भववैभव हें
दों दिवसांचें॥ यांत [illegible]चे तें साचें॥ केवळ ज्ञानानें गवें-
साचें[2]॥ कांहिं तरि धरी लाज हो॥ २॥ परमार्थाचा यत्न करा

---

१ विधारक म्हणजे रक्षण करणारें. २ गंवसाचें म्हणजे सांपडायाचें. + खटाटोप इ०

वा ॥ संग साधुचा सतत धरावा ॥ दीनपणानें काळ हरावा ॥ नृदेहाचें हेंचि काजहो ॥ ३ ॥

पद ४.

(सांवरियानें कवन मंत्र पढ ॥ फूक बजाई बांसरिया ॥ त्याचालीवर.)

हरिसी सतत भजावें मनुजा ॥ ध्रु० ॥ दुर्लभ ह्या नरदेह जाणुनी ॥ क्रोधादिक वर्जावें ॥ निशिदिनिं सज्जन पथासि धरूनी ॥ मुक्तिपदावर जावें ॥ १ ॥ दृश्य सकळ हें व्यर्थ मानुनी ॥ सच्चित् सुख समजावें हो ॥ कोण मि केंचा आलों कोठुनी ॥ हें चि त्वरित उमजावें हो ॥ २ ॥ दीन दयाघन चरित गाउनी ॥ प्रेमामृतें भिजावें हो ॥ गुरुवचनीं विश्वास ठेउनी ॥ दुर्जन संगा त्यजावें हो ॥ ३ ॥

पद ५.

(राग पिलु. ताल दीपचंदी.)

कोणी हरि बोलाहो कोणी हरि बोलाहो ॥ नकळत यम देइल झोलाहो ॥ ध्रु० ॥ देह गेह धन ममता सोडुनि ॥ प्रेमभरें निशिदिनिं डोलाहो ॥ १ ॥ शुक सनकादिक नामीं रतले ॥ झाला शीतळ शिव भोळाहो ॥ २ ॥ पापी अजामिळ वाल्मिक तरला

दीनदास चदले मोला ॥ ३॥ कोणी हरिबोला कोणी हरि०॥

पद ६. (रा. खमाज. ता. धिमा. तिताला.)

तो केला रामधणी॥ नरवर मुकुटमणी॥ ध्रु.॥ वर्णन करितां फिरला मागें॥ दशशतवदन फणी॥ १॥ शुक सनकादिक मोहित झाले॥ ज्याच्या शुभगुणगणीं॥ २॥ दया करुनियां दीन जनांसी॥ ठेवी निजचरणीं॥ ३॥ तो केला राम०

पद ७. (राग मुलतानी. ताल तिताला.)

तन मन रामचरणिं योजावें॥ धृ.॥ सकलहि असतां बळें त्यजावें॥ नरकासि कसें जावें॥ १॥ ईश्वरभावें गुरुसि पुजावें॥ दुर्जन घर वर्जावें॥ २॥ दीनवत्सल श्रीहरिसि भजावें आनंदें गर्जावें॥ ३॥

पद ८. (राग-मुलतानी. ताल तिताला.)

बोला रामकृष्ण हरि प्रयाग॥ ध्रु.॥ रामहि यमुना कृष्ण सरस्वति॥ हरि भागीरथि सांग॥ १॥ वाचिक स्मरण ध्यान तें मानस॥ कीर्तन कायिक लाग॥ २॥ देश काल विधिरहित सदोदित॥ अंध पंगु अनुराग॥ ३॥ सत्यलोकीं महि वर पाताळीं॥ सुर नर भजती नाम॥ ४॥ मुनि समाज तो साधु-

एकवर ॥ पापतिळाचा याग ॥ ५ ॥ खल मुंडण भक्तां संतर्पण देहपिंड सुखत्याग ॥ ६ ॥ श्वेतरक्त श्रीकृष्णपदाब्जीं ॥ दीन मधुप महाभाग ॥ ७ ॥ ॥ इति कीर्तन प्रकरणं संपूर्ण

प्रकरण ५ वें.

अथ रामायण प्रकरण

प्रारंभः

पद १ लें. (गड्याने कृष्ण ग० या चा०).

विश्वामित्र सभे आला ॥ मागतो माझ्या रामाला ॥ ध्रु० ॥ विनवा त्या ऋषि रायाला ॥ नका नेउं माझ्या बाळाला ॥ जरि हा मागेल दुग्धाला ॥ देइल कोण वनीं त्याला ॥ द्यावें पुत्र दान मजला ॥ १ ॥ कैकई फोडी हंबरडे ॥ कौसल्या ने फार रडे ॥ झाले नेत्रही कोरडे ॥ बोलती वेडें वांकुडें ॥ क्रूर हा कां नाहीं खपला ॥ २ ॥ कां रुसलासी जगदीशा ॥ मांडिली अमुची दुर्दशा ॥ मजला होती फार अशा ॥ वाटती उदास दाहि दिशा ॥ आतां काय वांचुनी सुख मजला ॥ ३ ॥ त्याविण आह्मां नाहिं कोणी ॥ जेसें मत्स्याला पाणी ॥ विनवा-

जोडुनियां पाणी ॥ आणा रघुकुल राजमणी ॥ अभय देदीनबंधु निजला ॥ ४ ॥

पद. २.

(विश्वामित्राचा व दशरथाचा वादरूप संवाद.)

पहिले जे जे नरपति झाले ॥ दानवीर सन्मार्गी चढले ॥ नाहीं तुज ऐसे माघारीं फिरले ॥ तूं मूर्ख राजा ॥ ध्रु० ॥ प्राण जातां उदक मिळालें ॥ देईना त्यासि शापिलें ॥ नाहीं ऐसें मजपासूनियां झालें ॥ मी मूर्ख नोहे ॥ १ ॥ पुत्रमांसही दिलें श्रियाळें ॥ परि याचकासि नाहिं दुखविलें ॥ त्या वंशीं तुज जन्म कसें बा झालें ॥ तूं मू० ॥ २ ॥ अंबऋषा दुर्वासें छळिलें ॥ सुदर्शनें त्या बहु कष्टविलें ॥ नाहीं ऐसें मजपासूनियां झालें मी मूर्ख नोहें ॥ ३ ॥ शिबिरायानें स्वमांस दिधलें ॥ शरणागतासि बहु तोषविलें ॥ त्या वंशीं तुज जन्म कसें बा झालें ॥ तूं मूर्ख राजा ॥ ४ ॥ इंद्रानें कर्णासि अडविलें ॥ दात्याच्या चर्मा कापविलें ॥ नाहीं ऐसें मज पासुनियां घडलें ॥ मी मूर्ख नोहें ॥ ५ ॥ अलर्क रायें नेत्र अर्पिले ॥ अंध ब्राह्मणा परिननिं दिलें ॥ त्या वंशीं तुज जन्म कसें बा झालें ॥ तूं मूर्ख राजा ॥ ६ ॥

राज्य हरिश्चंद्रानें त्यजिलें ॥ डोंबाच्या घरिं दास्यहि वरिलें ॥ त्या वंशीं तुज जन्म कसें बा झालें ॥ तूं मूरर्ख राजा ॥ ७ ॥ कपटानें स्वप्नांत न छळिलें ॥ क्रूरकर्म दात्यानें घडविलें ॥ दीनपणानें त्रिभुवन हें वश केलें ॥ मी मूरर्ख नोहे ॥ ८ ॥ छ ॥

पद ३. (माझ्या कृष्णा दे०) त्या चा०.

रामा कौतुक पाहसी काय ॥ उद्धरि मुनिदारा ॥ धृ० ॥ अज्ञानानें घडलें पाप ॥ कोपुनि मुनिनें दिधला शाप ॥ सदया दूर करा संताप ॥ तूं आइ बाप दासाचा ॥ १ ॥ द्यावें तिजला सुख वरदान ॥ राखी मुनि वनितेचा मान ॥ धरि मद्वचनाचा अभिमान ॥ अनुमान नकरी बा ॥ २ ॥ ऐकुनि उठला तो रघुराय ॥ धरिला गौतम वधुवरि पाय ॥ केले सर्वहि दूर अपाय ॥ हर्ष नमाय मुनिला तो ॥ ३ ॥ करिती सुरवर जय जयकार ॥ मुनि आलिंगी वारंवार ॥ सखया मजवरि हे उपकार ॥ तूंचि आधार या दीना ॥ ४ ॥ रामा कौ०

पद ४. (चाल - माझ्या कृष्णा०).

रामा खरेंच नेइल काय ॥ कोणि तरि सांगाहो ॥ धृ० ॥ कोमळ बाळ लहान फार ॥ नाहीं गेलें शरयू पार ॥ फिरेल

कोठें दारोदार ॥ नाहीं थार दोघांला ॥ १ ॥ रडती प्रजा आणि भूपाळ ॥ करिती सर्वहि जन हळ हाळ ॥ आला विश्वामित्र काळ ॥ माझें बाळ न्यायाला ॥ २ ॥ याला ह्मणती विश्वामित्र ॥ परि हा सर्वांचाहि अमित्र ॥ राघव फारचि कोमल गात्र ॥ नाहीं पात्र वनवासा ॥ ३ ॥ मूर्छित झाले जननी तात ॥ विनविति जोडुनि सर्वहि हात ॥ येऊं द्यावी दया मनांत ॥ न करा घात दीनाचा ॥ ४ ॥ रामा रवरें० ॥

पद ५. (चाल–माझा कृष्ण दे०.)

जानकि सांगे सहचरिला ॥ कळवी जनकासी ॥ ध्रु० ॥ हें धनु ठेवावें सदनीं ॥ विश्वासावें मद्वचनीं ॥ नाहिं तरि जाइन मी विपिनीं ॥ देह दहनीं होमिन हा ॥ १ ॥ काय करूं मज नाहीं धीर ॥ सत्वर दावा तो रघुवीर ॥ पाहिन कधिं शरयूचें तीर ॥ नयनीं नीर वाहातसे ॥ २ ॥ देइन कंठांतिल मणिहार ॥ प्रार्थी जोडुनि कर बहुवार ॥ सखये करि इनका उपकार ॥ होय उदार मजवरि तूं ॥ ३ ॥ मी वरिन तो श्री रघुराम ॥ जो का अखिल सुखाचें धाम ॥ तो हा सुरवरान अभिराम ॥ पूर्ण काम दीनासी ॥ ४ ॥ ७ ॥

पद ६. (चाल- गड्यानो कृष्णा०).

जो करि दुष्ट विरामाला ॥ कंकण न सुटे रामाला ॥ धृ०॥ पाहुनि करगत रुधिराला ॥ दशरथ व्याकुळ बहु झाला ॥ श्रम बहु झाले बाळाला ॥ नलगे सीता ही मजला ॥ आतां मी जातों स्वपुरीला ॥ १ ॥ क्रोधें बोले तें मुनिला ॥ घात हा सर्व तुह्मी केला ॥ लाविला कलंक वंशाला ॥ बाळक सोडिल प्राणाला ॥ मग मुनि समजावी त्याला ॥ २ ॥ जो का लाजवि मदनासी ॥ नर वीरांचा मद नाशी ॥ त्याच्या पाहुनि वदनासी ॥ कौसल्या करि रुदनासी ॥ त्रास बहु- झाला जनकाला ॥ ३ ॥ बोले कौसल्या प्रभुला ॥ मारिलें पथांत राक्षसिला ॥ वधिलें सहज सुबाहूला ॥ असा नव प्रताप आयकिला ॥ आतां कां कंप तुला सुटला ॥ ४ ॥ अंकीं घेउनियां प्रभुला ॥ करानें सर्व घर्म पुशिला ॥ मग रघुराय मंद हंसला ॥ सोडिलें कंकण बंधाला ॥ हर्ष बहु झाला दीनाला ॥ ५ ॥

पद ७. (राग मुलतानी ताल तिताला.)

विहिणी राग मनांतिल सोडा ॥ धृ० ॥ उठा सख्यानो चुकलों

ह्मणुनी ॥ सर्व मिळुनि कर जोडा ॥ १ ॥ तुमच्या योगें दिव्य मिळाला ॥ राम जानकिस जोडा ॥ २ ॥ आनंदानें बोला चाला ॥ वेळ राहिला थोडा ॥ ३ ॥ वस्त्र भूषणें कांहिं राज्य द्या ॥ शिबिका गज रथ घोडा ॥ ४ ॥ रामदास दीन त्वें राही ॥ सीता बहु तन वोढा ॥ ५ ॥

पद ८. (चाल- माझा कृष्ण दे०)

सोडवा माझ्या बाळाला ॥ कोणि तरी धांवा हो ॥ ध्रु० ॥ कंठिला पुत्रावांचुनि काळ ॥ झालें नवसानें हें बाळ ॥ चुकवा ऋषी रूप हा काळ ॥ ठेवितों भाळ मी पायीं ॥ १ ॥ झाली व्याकुळ बहु ती माय ॥ जेसी व्याघ्रें धरिली गाय ॥ रडे मो..लोनियां धाय ॥ आतां काय करूं देवा ॥ २ ॥ आधीं हरुनी मुनिचा मान ॥ रामें केला मग सन्मान ॥ करिती हर्षें सर्वही गान ॥ देती दान दीनासी ॥ ३ ॥ सोडवा मा० ॥

पद ९.

(चाल- आहारे देवा काय हें करविशी ॥ मातेच्या हसें बाळ०).

(परशुरामाचें व रामचंद्राचें युद्ध चाललेलें पाहून व तें महासंकट आलेलें पाहून सीता, हा पुढील पदानें धांवा करीत आहे.)

आहारे देवा काय आरंभीलें ॥ लग्ना आधीं मी कां नाहीं मेलें ॥ ध्रु० ॥ माता भूमी उदरीं कां घेईना ॥ विद्युल्लता मस्तकीं पडेना ॥ निर्दय ऋषी मजला कां मारीना ॥ बांधुनी यमस्वपुरीं कां नेइना ॥ १ ॥ कैसे मी केले होते मनोरथ ॥ देवें केलें तें सर्वही व्यर्थ ॥ केला नाहीं प्रपंच परमार्थ ॥ दावा कोणीं मजला सुपंथ ॥ २ ॥ पतीची सेवा मज नाहीं घडली ॥ सर्वांची पुण्यें दीन कशी झाली ॥ दशरथ जनका चिंता उपजली ॥ रामानें अभय देउनी सांवरिली ॥ ३ ॥

पद १०. (रागिणी झिंझुटी- ताल दी.चं.).

बाळावरि कां राग ॥ कैकेई करिसी आतां ॥ ध्रु० ॥ कौसल्येहुनि तुझिया भजनीं ॥ रामाचा अनुराग ॥ १ ॥ नवनीतासम मृदुल तनूवरि ॥ घालूं नकोही आग ॥ २ ॥ राज्य करो रामचि भरतासी ॥ दुसरें कांहीं माग ॥ ३ ॥ भरताहुनि मज राम आवडतो ॥ त्या वचनानें जाग ॥ ४ ॥ मज दीनाशीं सौख्य द्यावया ॥ सौम्य रितीनें वाग ॥ ५ ॥ बाळावरि कां राग

पद ११. (राग-मुलतानी-ताल तिताला-)

रामा नको मजला विसरूं ॥ ध्रु० ॥ हे बाळा मज चुंबन म्हण

उनि मुख कवणा पसरूं ॥ १ ॥ नूं स मजाविसि परि तुजवां-
चुनी ॥ शोक कसा आवरूं ॥ २ ॥ दीना परि या घरि कसि म
हूं ॥ मी गाय तूं वासरूं ॥ ३ ॥

पद १२. (रागिणी देस-ता- दादचंदा.)

राम राहिना काय करूं मी ॥ धृ· ॥ पळ पळ युगसम जाइल
आतां ॥ विष प्यालें तरि प्राण जाइना ॥ १ ॥ पुत्ररहित बहु
दिवस कंठिले ॥ कोणी ही जन आड येईना ॥ २ ॥ काय क-
रूं मज कांहिं सुचेना ॥ त्या वांचुनि मज सौख्य दिसेना ॥ ३
मज दीनांवरि रामहि रुसला ॥ प्रेम भरुनि मजलागिं पा
हिना ॥ ४ ॥

पद १३. (चाल- सांवळ्यानं साचा मूल खोयगे.)

राजिव लोचन वनिं गेलागे ॥ अहो बाई० ॥ ध्रु· ॥ ज्यावरि
आमुचा सर्वहि भरंवसा ॥ त्यासि कसा वनवास आलागे
॥ १ ॥ त्या वनिं दुर्द्धर राक्षसवसती ॥ ऐकुनियां माझा जी
व प्यालागे ॥ २ ॥ दुष्ट जनांहीं समय साधुनि ॥ घातला
हा मजवरि घालागे ॥ ३ ॥ मज दीनासि राम भेटवुनि ॥
पाजा कोणि अमृताचा प्यालागे ॥ ४ ॥ राजिव लोचन व०

पद १४. (चाल· गड्यानो कृष्ण गडी०)

मूर्च्छित पाहुनि बंधूला ॥ राघव व्याकुळ तो झाला ॥ धृ० ॥ शोक बहु होइल मातेला ॥ सांगूं काय सुमित्रेला ॥ पाहूं कसें उर्मिलेला ॥ कसें मुख दाखवुं स्वजनाला ॥ आतां काय जावें स्वपुरिला ॥ १ ॥ एकदां नेत्र भरुनि पाहीं ॥ मधुरतर बोल सख्या कांहीं ॥ तुजविणा मला कोणि नाहीं ॥ बुडवूं नको शोक डोहीं ॥ असा कां त्रास मनीं धरिला ॥ २ ॥ विपिनीं फिरतां श्रमलासी ॥ चवदा वर्षें उपवासी ॥ जानकिवचनें रुसलासी ॥ ह्मणुनि मज दीनासी त्यजिसी ॥ चल उठ जाऊं अयोध्येला ॥ ३ ॥

पद १५. (चाल– माझ्या कृ· देखि० कोणि०॥)

वत्सा सौमित्रा बाळा ॥ मजवरि कां रुसला ॥ धृ· ॥ झाला घोर वनीं बहु वास ॥ ह्मणवुनि होसी काय उदास ॥ अथवा [illegible]टाया तातास ॥ [illegible]र्गपदास तूं जाशी ॥ १ ॥ केले कटु वचनें तुज घाय ॥ सोशीं माझा तो अन्याय ॥ सोडुं नको हा बंधूराय ॥ मजसी अपाय नकरी तूं ॥ २ ॥ रावणाचा करोनि अंत ॥ मज दीनाचा भेटवि कांत ॥ ऐसा सीता करी आकांत ॥ निजला शांत करि त्रिजटा ॥ ३ ॥ वत्सा सौमित्रा० ॥

हनुमंत भरताप्रत बोलतात.

पद १६.

(राग मुलतानी. ताल तिताला. यावर दुसऱ्याही चाली बसतात.)

धरि भरथा धैर्याला ॥ सानुज सीतापति हा आला ॥ ध्रु० ॥ वालि वधुनि वानर ऋक्षाचा सुग्रीव नृपति केला ॥ मारुतिनें सीता हुर्षवुनि जाळियलें लंकेला ॥ १ ॥ सेतु बांधुनी सेनेसह मग त्रिकुटा जवळी उतरला ॥ रावण मारुनि देव सोडिले शोक सागरा तरला ॥ २ ॥ बिभीषणासी राज्य देउनी ॥ अंकीं घे जानकिला ॥ बसुनि पुष्पकीं त्वला त्वरेनें हाचि शब्द आयकिला ॥ ३ ॥ बोलेना चालेना पाहिना कांहिं सुचेना त्याला पुशिलें तरि इतुकेंचि बोलतो पाहिन कधिं [illegible]रताला ॥ ४ ॥ प्रेमें पाहतां रामहि उतरुनि ॥ आलिंगी [illegible]जनाला ॥ राज्य-करुनि बंधूसह शेवटिं मुक्त करी दीनाला ॥ ५ ॥ धरिं भर० ॥

इतिश्री रामायण प्रकरणं संपूर्ण.

समाप्त.

श्रीगुरु राधाकृष्ण चरणारविंदार्पणमस्तु ॥ श्रीरघुराजप्रसन्न

प्रकरण ६वें.

अथ श्रीमद्भागवत प्रकरण प्रारंभ.

पद १.

(राग-धनाश्री. ताल तिताला. दुसऱ्यार्द्धी चालींचा.

कृष्ण तुझा हा खातसे माती ॥ ध्रु० ॥ चाल यशोदे दाखविनों तुज
कांहिं मुखीं कांहिं हातीं ॥ १ ॥ वर्जियलें बहु परि ऐकेना ॥ ह्म-
णतो आह्मां पशु जाती ॥ २ ॥ रागें भरुनि ह्मणतो ज्ञा सांगा ॥
काय करिल यशोदा ती ॥ ३ ॥ गोप गोपिका दीनापरि हे ॥ ज्या
सि सदोदित गाती ॥ ४ ॥ कृष्ण तु० ॥

पद २. (राग-धना-ता. तिताला.)

मोहन माझा खातसे माती ॥ ध्रु० ॥ काय करूं याला किति सांभाळूं
वर्जूं किती दिन रातीं ॥ १ ॥ गोपहि सांगति बळरामहि हा ॥ सां-
गतसे खरें खाती ॥ २ ॥ दहिं दुध मधु नवनीत न खातो ॥ भक्षि-
तो धूळ कहाती ॥ ३ ॥ दीनकाम कल्पद्रुम नेच्छां ॥ धांवुनि धरि-
ला हातीं ॥ ४ ॥

पद ३. राग-काफी- ता. तिता०.

धांवा धांवा माधव गेला दूर ॥ माझ्या हातिं नये ॥ ध्रु० ॥ त्या मागें
पळतां श्रमलें मीं ॥ आला भरुनि माझा ऊर ॥ १ ॥ बाळपणें हा

काय करिल नेणो॥ हीवाटे हुरहूर॥२॥ दीना परि जीच्या नय-
नि चालिला॥ अश्रुजलाचा पूर॥३॥ धांवा धांवा माधव गे०॥

पद ४. (राग काफी, ताल तिताला).

नाहिं नाहीं मि पाहिली माती॥ आई मज मारूं नको॥ ध्रु०॥ द-
हिं दुध चोरुनि दे सर्वांसी॥ असे मज हे सांगताती॥१॥ तें न
ऐकिलें ह्मणुनि मजवरि॥ रुसले हे सांगाती॥ २॥ बळरा
महि त्यांनांचि मिळाला॥ जो माझा पक्षपाती॥३॥ दीनपणें
मृदु बोलुन हरिनें॥ लावियली नेत्रपातीं॥ ४ ॥ नाहि नाहीं०॥

पद ५. (राग भैरवी ताल तिताला.)

राहिं राहीं माधवा घरिं राहीं रे॥ ध्रु०॥ तुज अवडे जें तें मी दे-
इन॥ (जवांचुनि मज कोणी नाहींरे॥१॥ अर्धक्षण जरि-
तुज न पाहिलें॥ मग मज गोड न लागे कांहींरे॥ २॥ पोटिं-
धरुनि ह्मणे रडुं नको आतां॥ हास्य करुनि मजलागिं पाहीं
रे॥३॥ दीन तुझे हे गोकुळवासी॥ यांसि सुखद हो लवला-
हींरे॥ राहि राही माधवा०॥ ४॥

पद ६. (साकीच्या चालीवर.)

बाइ परिसावें तनयासि पुसावें॥ क्षणभरि स्वस्थ बसावें॥

ध्रु०॥ एक क्षणं पतिरूपें येउनी ॥ निजला हा शेजारींगे॥ न बो-
लवे नें केलें गोकुळीं॥ अशी करितसे जारींगे ॥१॥ निबिड अं-
धारीं क्रीडन असतां ॥ मम कन्या जांवाईगे॥ सर्वजनासीदा-
खविलें तें॥ लाउनियां हवोईगे ॥२॥ आह्मि उभयतां निद्रि-
त असतां॥ अद्भुत विनोद केला गे ॥ शेंडी वेणी दृढ बांधुनि
आपण ॥ मारितसे हाकेलागे ॥३॥ एक क्षणे हा देवाजव-
ळी ॥ करितो लघुशंकेलागे ॥ एक क्षणं माझे देवचि नेले ॥ ध-
रित नाहीं शंकेलागे ॥४॥ बाइ यशोदे कोण मुहूर्ती ॥ प्र-
सवलीस तनयातें गे ॥ सांगावें किति बोलावें किति ॥ मारा-
वें किति यातें गे ॥५॥ धेनु सोडुनी बैल बांधितो ॥ चोरुनितें-
तो दांवी गे ॥ वानर आणुनि भय दाखविती ॥ असि किति
मात वदावीगे ॥६॥ पालनेच वेळीं वत्स सोडितो ॥ लघुमुलां-
स रडवीतोगे ॥ दहिं दुध घेउनि मथुरेसि जातां ॥ वनिं मुलीं-
स अडवीतोगे ॥७॥ नानापरिंचे त्रास देउनी ॥ आह्मि रड-
तां बहु हंसतो गे ॥ जेसें याला ठाउक नाहीं ॥ आतां दीनसा
दिसतोगे ॥८॥ एक क्षणे पतिरूपें येउनी ॥ निजला हा शे०

१ जारी—ह्मणजे जारकर्म. २ हवाई—ह्म० चंद्रज्योत. ३ लघु ह्मणजे लहान.

पद ७. (राग झिंझोटी- ताल तिताला.)

आतां कसें तरि अवरूं या हरिला ॥ जातो पळोनि जरि करिं धरिला ॥ध्रु०॥ भीत नाहीं सर्पा केसरिला ॥ धांवुनि धरितो वानरिला ॥१ अन्य सदनिं करितो चाकरिला ॥ मागतो घरोघरिं भाकरिला ॥ ॥२॥ लपुनि बसूनियां गिरिकंदरिला ॥ वनिं धरितो व्रजसुंदरि-ला ॥३॥ दधि पय चोर्याचा भर भरिला ॥ दीन भाव येणें आद-रिला ॥४॥ आतां कसें तरि अवरूं या हरिला ॥ जातो पळोनि०

पद ८. (राग झिंझोटी- ताल तिताला.)

आणा धरोनि सये धांउनि मनमोहनासी ॥ ध्रु० ॥ दधिपय स-र्वही व्यर्थ नाशिलें ॥ नवनीत लुटवून दिधलें परासी ॥१॥ बा-ळ दिसे परि चंचळ व्याल हा ॥ फट फट हटकुन आणितां घरा-सी ॥२॥ पशु रक्षाया पाठविला जरि ॥ विपिनीं अडवून ध-रितो मुलीसी ॥३॥ यासि अवरितां दीन मी झालें ॥ करही झ-टकुन पळतो विदेसी ॥४॥ आणा धरोनी०॥

पद ९. (चाल- माझा कृष्ण देखिला०).

माधवा राहे निजसदनीं ॥ सांगूं किति तुजला ॥ध्रु०॥ दंइनम-धुपय घृत नवनीत ॥ ऐकवितें तुज सुस्वर गीत ॥ कथितें तुज

वडिलांची रीत॥ हें विपरीत करूं नको॥१॥कोणी ह्मणती फो-
डिला माठ॥ कोणी ह्मणती मूल अचार॥ सर्वहि सांगतिहा
बोभार॥ पाहती वाट नंदाची॥२॥ जरि का ऐकेल तव ता
त॥ फारचि मारिल बांधुनि हात॥ किंवा कोंडील तळघरांत
॥मोठा घात करितिल बा॥३॥ झाला आइचा व्याकुळ प्रा-
ण॥दीनहि बोले कृष्ण सुजाण॥ आतां नकरिन खरेंचि जा-
ण॥वाहतो आण पायांची॥४॥

पद १०. (चाल- तुझी मुरली पर घेणी अरे हरी.)

अडवुनि कां रे धरिसी मज रानीं॥ नंदाच्या तनया सोडुं नको
नयो॥ ऐसें हें करावें कर्म नीच शबरांनीं॥अडवु०॥ध्रु०॥ गे-
ल्या सांगातिणी॥ त्या विकितिल लोणी॥ मज मारवावें घरीं
तुह्मी हे शिरांनी॥२॥ तुझ्या साहसासी॥ जरि मी सांगेन कों-
सासी॥ तेव्हां फळ भोगिशील॥ तूं व्यर्थ शरीरानीं॥३॥सोडि
दीना मज राखि माझी लाज॥ तुज तृप्त करीन मी दुध सा-
खरानीं॥४॥

पद ११. (रा. देस- ताल झमरा)

अवरि तुह्मी या मन मोहनाला॥ फार हागे निर्भय होउनी॥

आमुच्या सदनिं येतो घडो घडी॥ यशोदे माय॥ ध्रु०॥ किति सां-
गुं याचि तुह्लागे नवलाई॥ धेनु सोडुनीयां गर्दभ बांधीतो॥ मु-
लां रडवीतो करी गडबडी॥ यशोदे माय॥१॥ कसि वागूं सांग
मला या व्रजगांवीं॥ अमुच्या मुलांसी चौर्य शिकवितो॥ मु-
ली फसवितो हरुनी लुगडीं॥ यशो०॥२॥ किति जागूं रात्रिं स-
दनीं मी एकली॥ यासि अवरितां दीन मी झालें॥ बहु त्रासलें
झाली हडबडी॥ यशोदे माय॥३॥

पद १२. (रामनामची तारक० ह्या चाली०)

गोपाळ गायी चारितो या वृंदावनीं॥ ध्रु०॥ ब्रह्मादिक हे सेवक
ज्याचे॥ अग्नि चंद्र रवि ज्या तेजाचे॥ नंद सुखाचा कंद ह्रदयिं
सानंद तया गोविंदा धरितो॥१॥ लक्ष्मी ज्याच्या सेवि पदासी
॥ तात मात [illegible] गात रातदिन गोकुळांत॥ दहिं भात मागतो
॥२॥ जें का कारण मुख्य जयाचें॥ अखिलां तारक नाम जया-
चें॥ दीन सदा अभ्यास हाचि करि॥ पीत वास रूपास पहातो३

पद १३. (रामनामाची गति कोण जाणेरे० याचा०)

कृष्ण रत्न ह्यातिंचें माझ्या गेलेंरे॥ नेणो कोणतें [illegible] कर्म अडवें
आलें॥ ध्रु०॥ स्वर्गीं देव गंधर्व रडताती॥ पशु प[illegible]ा भूमीवरी-

लोळतानी ॥ १ ॥ कैसें जावें येथुनी गोकुळांत ॥ नेथें नाहीं तोमाझा कृष्णनाथ ॥ २ ॥ धांव धांव माधवा देई भेटी ॥ दीना पाहे करुनी कृपादृष्टी ॥ ३ ॥

पद १४. (चाल-कृष्ण देखिला कीं काय).

कृष्णा कां मजवरि रुसलास ॥ सखया बोल किं रे ॥ ध्रु० ॥ नाहीं मर्दियले तव पाय ॥ दिधली नाहिं दुधाची साय ॥ सर्वही क्षमा करुनि अन्याय ॥ आतां खाय पोटभरी ॥ १ ॥ तुजला बांधियलें उखळास ॥ दिधला निष्ठुर वचनें त्रास ॥ दिधला नाहिं मुखांतिल ग्रास ॥ ह्मणोनि उदास झालासी ॥ २ ॥ कैसा करूं हा संसार ॥ घालूं कवणावरती भार ॥ तोडी कंठांतिल मणिहार दुःख अपार दीनांसी ॥ ३ ॥

पद १५. (चाल-रामनामाची गती कोण जाणे रे)

अरे बाळा तुज कोण माय व्यालीरे ॥ परी वाटे व्यर्थची वांझ झालीरे ॥ ध्रु० ॥ सकुमारा परतोनी मागें जाईरे ॥ शोक करितील तुझी बाप आईरे ॥ १ ॥ तुज पाहतां तान्ह्या दया येतीरे ॥ ह्मणुनी येतों तुजसी काकुलतीरे ॥ २ ॥ हा तो नाग काळाचा महाकाळरे ॥ न पाहसी या डोहीं विष जाळरे ॥ ३ ॥ वृक्ष जळलेउ-

टकीं कच्छ मीनरे ॥ पक्षि मरती नर होती पशू दीनरे ॥ ४ ॥ अरे० ॥

पद १६. (राग खमाज ताल तिताला.)

थांवागे बाई धरिला कान्हा चोर ॥ ध्रु० ॥ गोकुळिंच्या लोकांसी लागला ॥ निशि दिनीं ज्याचा घोर ॥ १ ॥ मारावें तरि खोडि सोडिना ॥ जसें बराडी ढोर ॥ २ ॥ सांगावें तरि ह्मणति यशोदा ॥ अल्प हें माझें पोर ॥ ३ ॥ दीन दिसे परि मज भासतसे ॥ सर्वांहुनि जो थोर ॥ ४ ॥

पद १७. (राग झिंझोटी ताल तिताला.)

नको तुझा संग आतां कोठें तरी जाऊं ॥ ध्रु० ॥ किति सोसावे अन्याय ॥ दिवसें दिवस अबरू जाय ॥ स्थलांतरीं तुझेचि पाय ॥ चिंतुनियां राहूं ॥ १ ॥ येथें नवनीत पय ॥ संसाराची सर्व ही सोय ॥ परी वनांतरीं माय ॥ मिळेल तें खाऊं ॥ २ ॥ ऐकेनाह्म अमुचा राजा ॥ घेतो तनयाचि मजा ॥ आह्मां दीना देई रजा ॥ तुझे गुण गाऊं ॥ ३ ॥

पद १८. (गड्यानो कृष्ण गडी आ० राजा म०) चा०

मूर्छित पाहुनि गोपाला ॥ कृष्ण तो व्याकुळ बहु झाला ॥ ध्रु० ॥ गव ते जलपीतां भ्रमती ॥ एक तेजका जवळि पडती ॥ विषा-

त्या योगें तळमळती ॥ पाहुनि इंद्रादिक रडती ॥ देव मग तया जवळि आला ॥ १ ॥ कृष्णा तो पाहुनि घाबरला ॥ व्याकुळ भूमीवरि पडला ॥ मुखासी मुख लावुं लागला ॥ शिव शिव घात कसा झाला ॥ कसें तरि करुं या कर्माला ॥ २ ॥ पेंधा बडजा वांकडा ॥ बहिरा आंधळा हा वेडा ॥ खुळपट पिचका हा लंगडा ॥ मुका काळा भोरा चिपडा ॥ एकही नाहीं गडि उरला ॥ ३ ॥ हरिणी कपिलाही भोरी ॥ बांडी नारंगी मोरी ॥ सांवळी बहाळी केसरी ॥ जांभळी गोळी पांढरी ॥ तुह्मीही मजवर कां रुसलां ॥ ४ ॥ माझी माता बोलियली ॥ किंवा मजपुन चुकि घडली ॥ विपिनीं फिरतां तनु श्रमली ॥ असि कां निर्दयता धरिली ॥ एकदां सांगा तरि मजला ॥ ५ ॥ तुमचें पाणि काय चुकलें ॥ नूतन तृण नाहीं दिधलें ॥ किंवा वत्सा मारियलें ॥ सांगा काय तरी झालें ॥ असा कां राग मनीं धरिला ॥ ६ माझें देव काय फिरलें ॥ अथवा पूर्वपुण्य सरलें ॥ मग प्रभुनेंहि धैर्य धरिलें ॥ कृपादृष्टिनें दीन उठले ॥ सुखि केलें पशुगोपाळा ॥ ७

पद १९. (चाल- कृष्ण देखिला काय.)

गाथा वरिल मला ती काय ॥ कोणि तरि सांगा हो ॥ ध्रु० ॥ सर्वहि

वर्णिताति निज फार ॥ नवनीताहुनि अति सकुमार ॥ भेटवा हाचि करा उपकार ॥ सर्व विकार जातिल हे ॥ १ ॥ आहे वृष-भानु श्रीमंत ॥ राधा रूपवती अत्यंत ॥ मी तो पडलों गरजवंत एवढी खंत वाटतसे ॥ २ ॥ ऐकुनि जन ह्मणती हें काय ॥ सर्वांचे तो धरितो पाय ॥ झाला वेडा कृष्णराय ॥ आली माय धांवोनी ॥ ३ ॥ बोलुनि दीन वचन जगदीश ॥ तंव पाहे तो यशोमतीस ॥ कृष्णा क्षणभरि स्वस्थ बैस ॥ कासावीस होउं नको ॥ ४ ॥ राधा०

पद २०.

(गड्यानो घ्या हरिच्या नामा ॥ लिहिनां कशास ओ नामा- त्या० चा०).

जेणें दैत्यगर्व हरिला ॥ कंकण न सुटे त्या हरिला ॥ धु० ॥ यशो-दा ह्मणे काय झालें ॥ तुझें तें बळ कोठें गेलें ॥ स्त्रिया बोलति हें ऐकिलें ॥ असें मन कां निष्ठुर केलें ॥ कृष्ण ह्मणे शक्ति नाहिं मजला ॥ कंकण० ॥ १ ॥ कलावति बोले राधेसी ॥ उठ मुलि सोड कंकणासी ॥ राधा पाहुनियां हरिसी ॥ सोडिलें कंकण बंधासी ॥ स्त्रिया कटु बोलति यशोदेला ॥ कंकण० ॥ २ ॥ य-शोदा ह्मणे तुह्मि ऐकावें ॥ कृष्णें सांगितलें भावें ॥ आधि राधे नें सोडावें ॥ कर जोडुनी मज नमावें ॥ तरि मग सोडिन मी त्या

ला ॥ कंकण० ॥ ३ ॥ पाहुनि कृष्णाच्या वदना ॥ नंद ह्मणे मज ये-
तें रुदना ॥ नेतों बालक निजसदना ॥ राधा मिळेल कां दीना ॥
सोडिलें हरिनें बंधाला ॥ कंकण० ॥ ४ ॥ इति भागवत प्रकरणं
संपूर्ण

प्रकरण ७ वें.

अथ भारत प्रकरण प्रारंभः

सुभद्राहरण.

पद १

(कृष्णा देखिला कीं काय त्याचा०).

ऐसें जाउनि त्या कृष्णा ॥ कोणि तरि सांगा हो ॥ ध्रु० ॥ मदनें फारचि
दिधला त्रास ॥ यास्तव घेइन मी संन्यास ॥ अथवा लावुनि रा-
ख अंगास ॥ काशीवास करीन मी ॥ १ ॥ न सुचे तुजवांचुनी उपा-
य ॥ सर्वहि करिताति हे अपाय ॥ मजला तारक तुझेचि पाय
अनाथ गाय सांभाळी ॥ २ ॥ विजयी नर तुजवांचुनि दीन ॥ जे-
सा उदकावां नि मीन ॥ सर्वहि असतां तुज आधीन ॥ उदा-
सीन होसी कां ॥ ३ ॥ ऐसें जाउनि त्या कृष्णा ॥ कोणि तरि सां०

पद २. (राग- काफी- ताल तिताला.)

या समयीं त्वरित गती धांव मुरारी ॥ ध्रु० ॥ सर्व मिळुनि गांजिति मजलागि श्रीहरी ॥ तुजवांचुनि संकट हें कोण नो हरी ॥ १॥ दुसरा मज साह्य नसे या महीवरी ॥ स्वजनांही मोकलिलें तूं कृपा करी ॥ २ ॥ माझे अपराध नको आठवुं अंतरीं ॥ फसली चिखलांत गाय काढि बाहेरी ॥ ३॥ तारियलें बहु जनांसि दुःख सागरीं ॥ त्याचि रिती हे सदया दीन उद्धरी ॥ ४॥ या स०॥

पद ३. (राग काफी- ताल दीपचंदी.)

द्रौपदीनें केलेला श्रीकृष्णाचा धांवा.

येउनियां मज तारिं आतां कृष्णा ॥ किति अळवूं तुजला भारी ॥ ध्रु० ॥ दुष्ट नष्ट खळ कटु वचनांची ॥ करिती मज भडमारी ॥ १ ॥ सबळहि पतिपरी देवगतीनें ॥ झाले रंक भिकारी ॥ हे मनमोहन हे जगजीवन ॥ ये बा धांव मुरारी ॥ ३॥ मज दीनाचें अतिसंकट हें ॥ तुजविण कोण निवारी ॥ ४॥ येउनियां०

पद ४ (चाल- कृष्णा देखिला कीं काय.) द्रौ० धां०

मजला सोडवा आतां ॥ कोणि तरि धांवा हो ॥ ध्रु० ॥ भाउजी मी धरितें पाय ॥ सांगा चुकलें तरि मी काय ॥ विनवा दुर्योध-

न राय ॥ हा उपाय करा जी ॥ १ ॥ माझा जळला तो अहंकार ॥ चुकलें चुकलें मीहो फार ॥ आतां करा तुह्मी उपकार ॥ मज आधार नाहीं हो ॥ २ ॥ कैसा येईनातो काळ ॥ करिना या शरिराची राळ ॥ कैसें फिरलें आज कपाळ ॥ ही हळहाळ वाटतसे ॥ ३ ॥ कोठें गेला तो जगदीश ॥ घेतलें कीं निद्रेचें मीस ॥ राखा राखा द्रौपदीस ॥ दीनदास विनवितसे ॥ ४ ॥ मजला सोड०

पद ५. (चाल· कृष्ण देखिला कीं काय कोणि०)

पाशुपतास्त्र प्राप्तीचे समयीं अर्जुनानें केलेला
शंकराचा धांवा·

ऐसें जाउनि त्या सांबा ॥ कोणि तरि सांगाहो ॥ ध्रु० ॥ दुर्योधनें दिधला त्रास ॥ हरुनी राज्य दिला वनवास ॥ व्यास ह्मणे जा धरि शिवकास ॥ ह्मणउनि दास तव झालों ॥ १ ॥ बसलों होतों तव गुण गात ॥ तों आला हा दुष्ट किरात ॥ वधिले वन्य प[illegible] संघात माझा घात करूं पाहे ॥ २ ॥ हरिलें गांडिव गिळिले बाण ॥ तो तंव उभा जसा पाषाण ॥ माझा खराचि घेइल प्राण ॥ धांउनि त्राण करि आतां ॥ ३ ॥ मी अपराधी बहु अज्ञान ॥ तूं सर्वोत्तम दयानिधान ॥ देउनि पाशुपतास्त्रचें दान ॥ राखी मान दीनाचा ॥ ४

पद ६. (चाल- चल जाऊं विदुरा घरीं उद्धवा०).

कृष्णा करिबा साम॥ जाउनि॥ ध्रु०॥ भीमार्जुन हे क्रुद्ध सदोदित॥ धाडुं नको बळराम॥ १॥ दुर्योधन दुःशासन शकुनी॥ कर्णादिक उद्दाम॥ २॥ दीन दयाळा तुज किति सांगूं॥ राखी आपुलें नाम॥ ३॥

पद ७.

(अरे मी भीष्म जरी श्रीहरी धरवीन चक्र करीं त्या०चा०)

अरे मी कृष्ण जरी तुजला॥ जिंकिन पार्थ करीं॥ ध्रु०॥ ज्याच्या स्नेहास्तव त्यजिली मी सोन्याची नगरी॥ माता धनसुत भ्राते त्यजुनी॥ करितों ही चाकरी॥ १॥ मातेच्या इच्छेस्तव आणिला स्वर्गीचाही करी॥ त्या वीरासी युद्ध कराया कोण असे भूवरी॥ २॥ सर्व सुरांचा स्वामी शंकर तोषविला समरीं॥ इंद्रद्वेष्टे मारुनियां जो मिरवी मुकुट शिरीं॥ ३॥ गोग्रहणीं येकेंचि पळविले सायुध कुरु वैरी॥ तो प्रसंग मनिं स्मरण करुनियां बडबड दूर करी॥ ४॥ हरिमय हें जग हरि विजयश्री मग तूं कोण नरी॥ शूर जनांनीं बोलुं नये बहु हातें करणि खरी॥ ५ शिष्य असोनि भार्गवरामासि खिळिले शरनिकरीं॥ दीनपणा सोडुनि बहु गर्जसि धन्य तुझी वैखरी॥ जिंकिन०॥ ६॥

पद ८. (चाल- कृष्णा देखिला कीं काय).

भीष्मानें अर्जुनास अगदीं विकल केल्या समयीं अर्जुन श्रीकृष्ण संवाद.

पार्था मजवरि कां रूसलास॥सखया बोलकिरे॥ ध्रु.॥ दिधलानिष्ठुर वचनें त्रास॥ यास्तव झालासि बा उदास॥ आतां पुरवी मनांतिल आस॥ धरूं मी कांस कोणाची॥१॥ सुटलें तुज करितां घरदार॥ तुजविणें दुःखद हा संसार॥ नाहीं कोणाचाही अधार॥ दुःख अपार किति वर्णू॥ २ ॥ तुजसाठीं धरिला अवतार॥ करुनी दुष्टांचा संहार॥ धर्मा देउनि राज्यभार॥ करिन पार दीनासी ३

पद ९. (चाल- कृष्ण देखिला कीं काय.)

अर्जुन श्रीकृष्णाप्रत बोलतो.

कृष्णा सोडिं आतां माझि आस॥आवरी दुःखातें॥ ध्रु.॥ ऐकुनि तव हे मृदु वाग्बाण॥ होतो व्याकुळ माझा प्राण॥ रक्षी माझे बंधु सुजाण॥ माझी आण तुज सखया॥१॥क्रोधें खवळला बहुवीर॥ वाटे उडविल माझें शीर॥ केलें सकळहि विकळ शरीर॥ आतां धीर मज कैंचा॥ २॥कादीं मानेवरुनी मान॥ सोडुं नको आमुचा अभिमान॥करि मद्वचनांचा सन्मान॥ तूं अनुमान नकरीं बा॥३॥ ऐकुनि घाबरला यदुराय॥ तुज हा दीनचि गम-

ला काय ॥ कवणें केला सांग अपाय ॥ त्याची माय रडविनमी ॥४

पद १०. (रागिणी काफी. ताल दीपचंदी.)

भीष्म श्रीकृष्णाप्रत म्हणतात.

धांवुनियां मज मारि ॥ आतां कृष्णा ॥ स्वर्गी जाइन सह परिवारीं
ध्रु. ॥ कमलाहुनि तव मृदुल पाउलें ॥ त्यांसि श्रमविलें भारी ॥१॥
खळसंगतिनें बहु मळलों मी ॥ त्या दुरितासि निवारी ॥२॥ जन्म
सफळ माझें अज करिवा ॥ त्रिजगीं कीर्ति उभारी ॥३॥ दीनाचा प-
ण सत्य करी तूं ॥ भक्तकाज कैवारी ॥ आतां कृष्णा धांवु० ॥४॥

पद ११.

(गड्याने घ्या हरिच्या नामा ॥ त्रिहितां कशास आराम. त्या चालीवर.)

समरीं अभिमन्यू पडला ॥ ऐकुनि नरपति[1] घाबरला ॥ ध्रु. ॥ येउनि
सर्व स्त्रिया रडती ॥ करानें वक्ष भाळ पिटिती ॥ किंनिमित्त्या बा-
ळा[2] आठविती ॥ मूर्छित भूमीवरि पडती ॥ अतां काय वांचुनिअ-
पुल्याला ॥१॥ उत्तरा बोले मृदुवचनीं ॥ कशी मी राहूं या सदनीं
कशी निज येइल सुखशयनीं ॥ कवणा पाहूं या नयनीं ॥ म्हणु-
नी जाइन पतिलोकाला[3] ॥२॥ स्वजनहि धांवुनियां आले ॥ व्याकु-

१ नरपति म्हणजे धर्म किंवा अर्जुन. २ बाळा म्हणजे अभिमन्यूला. ३ ब्रम्हलोक.

ळ रुपा पुढें पडले ॥ यापरि पशुपक्षी रडले ॥ स्वर्गी देवहि गहिं-
वरले ॥ दुःखें सूर्यहि मावळला ॥ ३ ॥ सांगूं काय अर्जुनाला ॥ कसें
मुख दाखवुं कृष्णाला ॥ देव मग समजावी त्याला ॥ अंसा कां
दीन भाव धरिला ॥ तुमची लाज असे मजला ॥ ४ ॥ समरीं० ॥ ॥

पद १२. (चाल- चल जाऊं विदुरा घरीं उ०).

माझें बाळक मजला दावागे ॥ ध्रु० ॥ ह[illegible]न मृदुवचन सदो
दित ॥ जो मम प्राणविसावा ॥ १ ॥ नेत्र भरुनि पाहतांचि जया-
नें ॥ सर्व ताप हरपावा ॥ २ ॥ जो जें मागेल तें त्या देउनि ॥ जनिं
वनिं शोध करावा ॥ ३ ॥ जो हितकारक दीन जनांही ॥ प्रेम धरु-
नियां गावा ॥ ४ ॥

पद १३. (राग पिलु- ताल त्रिताला०)

जयद्रथ दुर्योधनाप्रत बोलतो.

मजला राया जाऊं दे ॥ नाहिं तरि अर्जुन मारिल ॥ ध्रु० ॥ अभि-
मन्यूशीं मारियलें रणीं ॥ केलि प्रतिज्ञा माझिया मरणीं ॥ अ-
स्त न होतां उदयिक तरणी ॥ माझा मज देश पाहूं दे ॥ १ ॥ दुः
शीला धरणी वरि पडली ॥ रायानें धांवुनियां धरिली ॥ दी-
र्घ स्वरानें सकरुण रडली ॥ आतां मज चुडे लेउं दे ॥ २ ॥ तुज

करितां मी वाइट झालों॥ तव भगिनीसी मी अंतरलों॥ कांहिसुचेना मी तरि भ्रमलों॥ आतां मज विष खाऊं दे॥३॥ ऐकुनि सर्वहि व्याकुळ झाले॥ धैर्यबळें दुर्योधन बोले॥ पांडव हीन दीन बळ केले॥ त्यांचा मज सुड घेउं दे॥४॥ मजला राया०॥

पद १४. (चल जाऊं विदुरा परीं उद्ध०).

अर्जुन श्रीकृष्णाप्रत म्हणतो.

कृष्णा दारववि त्या दुष्टाला॥ध्रु०॥ कपटानें लघु[1] बाळ मारिलें॥ किति वदुं त्या कष्टाला॥१॥ द्रोण कृपाचार्य त्या मिळाले॥ लाज नसे शिष्टांला॥२॥ अशा कृतघ्नां[2] वर देण्यासहि॥ योग्य न शिपिविष्टाला[3]॥३॥ दीन दशा सर्वांची कादिन॥ मारुनिपर पुष्टाला॥४॥

पद १५. (उद्धवा शांतवन करिंजा त्या गो०)

दुःशासन वधाचे समयीं भीम दुःशासनास भाषण करितो.

भीमसेन बोले दुष्टा॥ आठवि ज्या केल्या चेष्टा॥ध्रु०॥ विष चारुनि सर्प डसउनिं बांधुनि डोहीं बुडवीलें॥ द्रोपदिसी सभाप्रसंगीं गांजुनि आह्मां कढवीलें[4]॥ सर्वस्व हरुनियां चोरा वनवासासहि पाठविलें॥ चाल ॥ दास्यही सर्व घडवीलें॥ नाना क्लेशेंस-

१ लहान मूल. २ केलेला उपकार न जाणणारे. ३ शिपिविष्ट म्ह० शंकर. ४ संतापविलें.

डवीलें ॥ चाल वाहिली ॥ त्याचें फळ घे पापिष्ठा ॥ १ ॥ द्रौपदीच्या प्रेम [illegible] रखलें ॥ तेरा वर्षे अंतरलों ॥ दगडाची उशी करुनीयां दर्भाच्या [illegible] नीं निजलों ॥ द्रौपदीही दासी झाली मी बल्लव नीचहि झालों ॥ चाल ॥ धर्माच्या वचनीं भ्यालों ॥ आतां तव सन्मुख आलों ॥ चाल ॥ पाचारी सात्या ज्येष्ठा ॥ २ ॥ ऐकुनियां कठोर वचना ॥ कर्णादिकही घाबरले ॥ द्रौपदिनें सानंदानें मस्तकीं केश सांवरीले ॥ पाहुनियां त्या चरितातें हरिचें मनही गहींवरलें ॥ चाल ॥ प्रभुनें दीना आवरिलें ॥ कीर्तीनें भीमा वरिलें ॥ चाल ॥ मारविलें त्या खल नष्टा ॥ ३ ॥ भीमसेन बो० ॥

पद १६. (चाल- कृष्ण देखिला कीं काय.)

[illegible] समयीं द्रौपदीचा भीमसेनास अगत्याचा निरोप.

ऐसें [illegible] समरीं ॥ भीमा सांगा हो ॥ ध्रु० ॥ ज्या दुष्टें बहुदिवस [illegible] ॥ केला दुर्धर विपिनीं वास ॥ त्याचा त्वरित करूनियां [illegible] ॥ माझी आस पुरवावी ॥ १ ॥ विपिनीं आला जैं दुर्वास ॥ [illegible] ग्रास ॥ त्याहि शांतविलें उग्रास ॥ पीतवास [illegible] ॥ २ ॥ सभेंत नेउनि हरिला मान ॥ केशीं धरुनी ओढिली मान ॥ तुमचा केला जो अपमान ॥ तो अभिमा-

न सोडुं नका ॥ ३ ॥ क्रोधें बोले भीमस्कजाण ॥ वचना सत्य करि-
न मी जाण ॥ खोटें नाहीं तुझीच आण ॥ मनांत आण कृष्णा
तें ॥ ४ ॥ तुझांसि केले बल्लवदास ॥ स्वजनीं बहु केला उपहा
स ॥ आतां होउं नका उदास ॥ दीनपणास सोडुन द्या ॥ ५ ॥ ७ ॥

इति भारत प्रकरणं सं०

प्रकरण ८ वें.

अथ स्फुट प्रकरण प्रारंभः

पद १.

(चाल-रामाहो जय रामाहो ॥ पतित पावना पूर्ण कामा हो ॥)

सांबाहो अवलंबाहो ॥ तारि तारि नकरा विलंबाहो ॥ ध्रु० ॥ कांता
हो त्यजि एकांताहो ॥ धांवुनियें उमाकांताहो ॥ १ ॥ हाराहो वाँ-
स्कि हाराहो ॥ करि करि भवपरी-हाराहो ॥ देवाहो महादेवा-
हो ॥ रक्षी या दीनासी वामदेवाहो ॥ ३ ॥

पद २. (साकी- विश्वामित्रें यावर काळें करू०)

श्रीशिवसांबा मज अवलंबा शरणागत तुझिया चरणीं ॥ कृपा

१ वामदेव म्हणजे श्रीशंकर. + भवसिंधूंतून पार पाडा. ⁂ वासुकि म्ह० सर्प त्याचा हार.

करुनियां मज सांभाळी॥ सादर मी पापाचरणीं ॥१॥ पुण्यकर्म मज कांहिं न घडलें व्यर्थ जन्मलों या धरणीं॥ जें नकरावें तेंही केलें ॥ बहु वाइट माझि करणी ॥२॥ सर्वांसी भय यमरायाचें तोहि सदां रत तव स्मरणीं॥ ऐकुनियां मज अनंद झाला नाहीं भीत आतां मरणीं ॥३॥ अद्भुत शक्ति तुझ्या नामाची॥ वर्णिति दोषांच्या हरणी॥ अनाथ जड मूढा दीनाचा॥ तूंचि दक्षबाऊ न्हरणीं॥४॥

पद ३. (चाल–गोरि लाज आवरिल कोण.)

चिलियाचे वधसमयीं चांगुणेनें केलेला श्रीशंकराचा धांवा.

धांव धांव या संकटीं ॥ दीन-वत्सला[1] हो ॥ ध्रु० ॥ चिंतुनियां उमा-रमणा ॥ धरिले अतिथिचे चरण ॥ तो करितो पुत्रमरण ॥ क्रूर जाहलाहो॥ १ ॥ पतिवचना काय करूं॥ बाळकासी कसें चिरूं॥ कवणाचे पाय धरूं॥ कंठ शोषलाहो ॥ २ ॥ ज्यासी पोटिं वाहि-यलें ॥ स्तनपानें वाढविलें॥ आईनें त्या कापियलें ॥ दोष हा म-ला हो॥ ३॥ आणुनि नेत्रांसि पाणी ॥ आळवितां दीनवाणीं॥ ग-हिंवरला शूळपाणी[2] ॥ दास रक्षिला हो ॥४॥ धांव धांव या सं०॥

---

१ दीनवत्सल म्हणजे दीनावर दया करणारा शंकर. २ हस्ताचे ठायीं त्रिशूल असा शंकर.

पद ४.

(डोळा उघडेना उघडेना उघडेना ॥ पश्चात्ताप घडेना-या चा०).

माझ्या चिलयारे चिलयारे ॥ नेतें तुजचि लयारे ॥ ध्रु० ॥ होउनि-यां मी माता ॥ करितें शत्रुतुल्य तवघाता ॥ १ ॥ राज्यावरि न बसविलें ॥ बाळपणांतचि तुज कापियलें ॥ २ ॥ नको म्हणूं मज आई ॥ माता झाली तुझी कसाई ॥ ३ ॥ कोणाचें मुरव पाहूं कोणा संगें आतां जेऊं ॥ ४ ॥ तुजवांचुनि मी दीन ॥ झाल्यें या संसारीं हीन ॥ ५ ॥ माझ्या चिल० ॥

पद ५. (चाल- चल जाऊं विदुरा घरीं उद्ध०).

जय शंकर हर पार्वति रमणा ॥ ध्रु० ॥ विश्वेश्वर वृषवाहन शंभो ॥ मदन दहन नागा भरणा ॥ १ ॥ भस्मविलेपन शशिशेखर हर ॥ सर्व सुराराधितचरणा ॥ २ ॥ नारायण गुण स्मरण परायण ॥ भक्तजना दीनोद्धरणा ॥ ३ ॥ जयशंकर पार्वति रमणा ॥

पद ६. (चाल वरील पदाची.)

भागीरथी स्तव.

तारक सर्व जना भागीरथि ॥ तारक सर्व जना ॥ ध्रु० ॥ दर्शनपान स्नान करुं जातां पदोपदीं ज्या पथीं ॥ अश्वमेध राजसूय

फळहें मिळतें व्यास कथी ॥ १ ॥ दर्शन करितां जडजीवांचें ॥ पातक सर्व मथी ॥ पान करी त्या सभाग्य करुनी चढवी दिव्यरथीं॥२॥ स्नान करी त्या कृतार्थ करुनी मुक्ती दे चवथी ॥ दीन झालिया प्रसन्न होउनि दुरितातें उलथी ॥ ३ ॥

पद ७. (अभंगाचे चालीवर.)

वाचे ह्मणतां काशी काशी ॥ जळती पातकांच्या राशी ॥ १ ॥ करितां भागीरथीचें स्नान ॥ होतें मुक्तीचें सोपान ॥ २ ॥ पंचगंगा मणिकर्णिका ॥ त्या तों त्रैलोक्य तारका ॥ धुंडिराज दंडपाणी ॥ गुह्य गंगा वदावाणी ॥ ४ ॥ अन्नपूर्णा अन्नें पाळी ॥ विश्वेश्वर जन्म टाळी ॥ बिंदुमाधव हे भैरव ॥ नाशिती दीनांचे रौरव ॥ ६ ॥

पद ८. (चाल- अभंगाची- सुंदर तें ध्यान.)

विश्वेशा माधवा धुंडिराज देवा ॥ दंडपाणी ध्यावा भैरव तो॥ १॥ वंदा काशी गुह्य गंगाही भवानी ॥ मणिकर्णिका स्नानीं जीवन्मुक्त ॥ २ ॥ ऐसी नित्य यात्रा जे नर करिती ॥ दीना उद्धरती दर्शनमात्रें ॥ ३.

पद ९. (चाल- चलजा- बिंदु- घरीं.)

प्रभुविण कोण जगा सांभाळी ॥ जन्ममरण ही टाळी ॥ ध्रु॰॥

पृथ्वीसही पाणी बुडवीना ॥ पाणि न अग्नी जाळी ॥ अग्नीतें वायू उडवीना ॥ वायू ठेवी आभाळीं ॥ १ ॥ नाभिस्थानीं आपण बैसुनी ॥ देहातें प्रतिपाळी ॥ प्राणवायुनें ऊर्ध्वहि नेतो ॥ अपान खालीं गाळी ॥ २ ॥ स्थावर जंगम जग वांचवितो ॥ त्यास्या संकर काळीं ॥ ब्रह्मेंद्रादिक ज्यासि कांपती ॥ दीनातें कुरवाळी ३

पद ११ (चाल- चल जाऊं विदुरा घरीं.)

जगाचा ईश्वर ..लदाता ॥ स्थावर जंगम नानापरिचें ॥ जग हें नाचविता ॥ ध्रु० ॥ रात्रंदिवस हे लोक दृष्टिनें ॥ स्वप्रकाशा सविता ॥ अयस्कांत[1] लोहातें हलवी ॥ विषचकोर पाहतां १ ॥ क्षितिवर अंकुर ज्या योगानें ॥ गर्भी जो त्राता ॥ रथ्य नौकादिक अचेतनासी ॥ चेतन चालविता ॥ २ ॥ कर्म ह्मणावें तरि तें नश्वर ॥ अपूर्वांशी[2] जडता ॥ जीव ह्मणावे तरि अज्ञानी ॥ भूतांशी न सत्ता ॥ ३ ॥ सेवा फल ..लांतरीं द्याया ॥ राजाचि नियंता ॥ साक्षी जसा यथार्थ बोलतो ॥ नधरोनि अहंता ॥ ४ ॥ उदक जाळिल्या अग्नी कारण ॥ लोहांस[3] तसता ॥ दीनपणानें भजशिल जरि तुज ॥ होईल उद्धरिता ॥ ५ ॥ जगाचा ई०

१ अयस्कांत म्हणजे लोहचुंबक. २ अपूर्व= पुण्य. ३ लोहास म्हणजे लोखंडा.

पद ११. (चाल- चल जाऊं विदुरा घरीं.)

(दंडकारण्यांत श्रांत झालेली सीता लक्ष्मणाप्रत बोलते.)

लछमन धिरें चलो मैं हारी॥ ध्रु०॥ चलत चलत मोरे पाव थकग- ये॥ काया जलगइ सारी॥१ दंडक बन अबेलो नहिं आवत॥ हो गइ मरन तयारी॥२॥ नहि पालखि नहि हाती घोडा॥ नहि स- खिजन हितकारी॥३॥ चलिये मिथिला नगर जनकघर॥ ज- हां मेरी महतारी॥४ दीनदास प्रभु सो बिनती कर॥ रखिये ला- ज हमारी॥५॥

पद १२. (चलजाऊं विदुरा घरीं उ०) या-चा.)

(सीता शद्धार्थ हनुमंतास पाठविले समयीं रामचंद्रानें दिलेली मुद्रिका हनुमंतानें

दादेस ठेवलेली पाहून लक्ष्मण रामचंद्राप्रत भाषण करितात.)

लछमन करत बिनंती प्रभुसो॥ये मरकर पसूसमान बनचर॥ इनपर धरत भरोंसो॥ ध्रु०॥ केकइ ज्युने सबहि छिनलियो बन- बन धुंडत पगसो॥ सीयाजीको चोर लेगयो॥ लगत नाहीं संदे- सो॥१॥ एक हाती मुद्रिका हातमो॥ वाहिगई अंज दिनसो॥ वा- मरकटनें खाकर डाली॥ मे देखी नेनसो॥२॥ रामजिके सुन नैन भर आये॥ मे व्याकुल बिरहनसो॥ दीनदास प्रभु बोले लछमन

---

१ अबलो म्हणजे अद्यापि. २ महतारी म्हणजे आई. ३ सीयाजीको= सीतेला.

तुमहि संबालो हमसो ॥३॥

पद १३. (चाल— चल जाएं विदुरा घरीं इ०).

आया तब दौरत बायु कुमार ॥ ध्रु० ॥ क्रोधनसो सब अंग थरारत शिर पुच्छनको भार ॥ १ ॥ राम कहे क्यों लग्यो संदेसो ॥ काहासी यास कुमार ॥ २ ॥ रावनकोमत अब कैसो है ॥ कहियो सबहि बिचार ॥ ३ ॥ अबकाहेसी याको पूछत ॥ हमको करत गव्हार ॥ ४ ॥ तुमतो होल सन्यासि प्रभुजी ॥ छोडदियो संसार ॥ ५ ॥ हमम्मर्कट पसुसमान बनचर ॥ बनमें सब घरदार ॥ ६ ॥ तुम हमसे कैसे कर जोरत ॥ कहियो प्रभु एक बार ॥ ७ ॥ तुमसे जानके नहि मारतहूं ॥ यहिमानो उपकार ॥ ८ ॥ दीनदास प्रभु हसकर बोलत ॥ लछिमन रोवनहार ॥ ९ ॥ आया० ॥

पद १४. (चल जाउ विदुरा घरीं इ०). याचा०

चलो मन जमुनाजीके तीर ॥ ध्रु० ॥ जमुनाजीको निर्मल पानी ॥ सीतल पूत समीर ॥ १ ॥ बनसि बजावत गीत कन्हैया ॥ संगलिये बलबीर ॥ २ ॥ दीनदास प्रभुके चरननमो ॥ रखदे सकल सरीर ॥ ३ ॥

पद १५. (राग मुलतानी- ताल तिताला-).

गुरुबिन रहिये कौन बाटी ॥ मन पावनाही ॥ ध्रु० ॥ ध्यांनो सबदा

कर ले बंदे आगे जमकी फासी ॥ फिर तो सवदा नही बनेगा नहि बनिया नहि बाटी ॥१॥ मेरा मेरा कहता बंदे तेरा कोई-नाहीं ॥ बिपतकाल जब आन परेगा सद्गुरु होवे साहीं ॥२॥ हुशार होजा दोलतके सब जोरू लरके भाई ॥ दीन होकर अबहित कर ले रघुबर चरन सहाई ॥३॥

पद १६. (सीताराम बसीहो मेरे मनमें.)

राधा माधो बसीहो नेननमें ॥ ध्रु० ॥ येक घनशाम येक चंपकबरनी ॥ खेलत कुंजनमे ॥१॥ अंगसो अंग लगाय निहारत ॥ ~ लतरंगनमे ॥२॥ गोप गोपिका गय्या बछुरा ॥ डूबत आनंदमे ॥३॥ दीनदास प्रभु सेवा सादर ॥ नाचत ग्वालनमे ४

पद १७. (चला जाउं विदुरा घरीं उद्धवा.)

सब देवनमो बडी अंबा[1] ॥ सबदेव० ॥ ध्रु० ॥ समश्रृंग परबतके ऊपर ॥ बर देनेकु खडी ॥१॥ धूम्र नेन[2] और चंड मुंडसे सुंभ निसुंभसो लडी ॥२॥ जय जयकार करत सेवक ॥ जन देख सिंघपर[3] चढी ॥३॥ दीन मूढ सरनागत जनकी ॥ सुखसंपन की जडी ॥ सब देवनमो बडी अंबा सब देवनमो० ॥

१ अंबा म्हणजे अंबिका देवी. २ धुरानें भरलेले डोळे. ३ सिंहावर बसली. ७

पद १८.

(नाथ कैसे जगके बंद छुराये त्या चालीवर.)

नाथ कैसे सकट तृनासुर मारे ॥ या पन मे आपही हारे ॥ ध्रु०॥ द्वादश दिन बिच आई ॥ स्तन डारे मुखमे बिख पूतना ॥ खीख पिये और प्रानहि लीये ॥ सब गोकुल जन तारे ॥१॥ सकटा सुरको गपसो मान्यो ॥ तुम सबके रखवारे ॥ तृना सुरको कंठ पकरके ॥ दंहसो प्रान निकारे ॥२॥ येहि लगन बिच पैजरची हैं ॥ आये बधूजन सारे ॥ छूटत नाहि कंकनरा धाको ॥ बैठे दीन बिचारे ॥३॥ राधा जूकी सखिया सयानी ॥ गारि देत तब दौरे ॥ याते कैसी राधा दीनी ॥ वो गोरी ये कारे ॥४॥ मात जसोदा मनसकुचाई ॥ सब को तात तप सारे ॥ कोमल गात मेरे मोहनके ॥ देखो कर्हि बिघारे ॥५॥ प्रभुको क्रोध अयातब सुनके ॥ छिनमे कंकन छोरे ॥ दीनदास सब सरन आये तब ॥ बिनती करत कर जोरे ॥६॥ ना०

इति स्फुट प्रकरणं संपूर्ण ॥ श्री सद्गुरु राधाकृष्णा चरणारविंदार्पणमस्तु.

१ सयानी म्हणजे शाहाणी. २ वा म्ह० ही. ३ कार म्हणजे काळे. ४ छिन = क्षण.

॥ श्री· ॥

हा ग्रंथ छापविण्याबद्दल श्रीमत्स्वामी महाराज यांच्या कृपापात्र आज्ञाधारक व ब्रह्म विद्यार्थी मंडळी पैकीं ज्यांणीं मदत केली त्यांचीं नांवें :—

१ श्री० अलिजा बहादूर जयाजीराव महाराज शिंदे सरकार यांचे श्रीक्षेत्र प्रयाग, श्रीक्षेत्र गया व श्रीक्षेत्र काशी या त्रिस्थळी धर्मसंस्थानचे कारभारी रावसाहेब विनायकराव बाजीराव.

२. रावसाहेब त्र्यंबकराव दामोदर बांकडीकर कारभारी संस्थान श्रीगंगामहाल श्रीक्षेत्र काशी.

३. रा· रा· बळवंतराव सखाराम केनकर दु-ळ्या· नि· श्री गंगा महाल श्रीक्षेत्र काशी

४. रा· रा· सदाशिव हरी गोडबोले कारभारी नि० श्री० बिवलकर अलिबागकर राहणार श्रीक्षेत्र काशी ब्रह्मघाट.

५. गोपाळराय बाळकृष्ण उर्फ आबा सरनाईक चांबळीकर राहणार श्रीक्षेत्र काशी दुर्गाघाट.

६. श्रीह० गोविंद बाबा कानिटकर

७. श्रीहरि० रामचंद्र बाबा चांदवडकर.

८. श्रीहरि० नारायण बाबा नाशिककर श्री बाळाजीचे आश्रित.

९. वे· शा· सं· रा· रा· एकनाथ शास्त्री नाशिककर.

१०. वे· शा· सं· रा· रा· हरिशास्त्री बाबा शिगळकर.

११ श्रीहरिगुरुभक्त पांडुरंग बाबा पैठणकर.

श्रीहरि० अण्णाबाबा दशपुत्र त्र्यंबककर.

श्रीहरि· मधु-सूदन बाबा नाशिककर.

श्री० हरि० नारायण बाबा शेवगांवकर.

श्रीहरि० केशव बाबा श्रीगोंदेकर.

श्रीहरि० लक्ष्मण बाबा गुलसराईकर.

श्रीहरि० विष्णुबाबा पिंगळे त्र्यंबककर.

श्रीहरि० नारायण बाबा श्रीगोंदेकर.